


R.N.I.No.1814/57

एकमेव स्वतंत्र दैनिक

# नवाकाळ

NAVAKAL

• मुंबई, शनिवार १६ ऑगस्ट, २०२५ • वर्ष-१०३, अंक-१६३, पाने-८, किंमत : ₹ ५

•Issue - 163, Vol.- 103 Marathi - Daily - Mumbai, 16 August, 2025 Page- 8 Price- Rs. 5/-

24x7 : www.navakal.in • संपादक- रोहित रमाकांत पांडे Email-navakal.1923@gmail.com




## मुंबई, ठाणे, नाशिकमध्ये ठाकरे बंधू एकत्र लढणार

### संजय राऊतांची घोषणा

**आगामी स्थानिक स्वराज्य संस्था आणि महापालिका निवडणुकीत उद्धव ठाकरे आणि राज ठाकरे एकत्र येणार असल्याची जोरदार चर्चा सुरू आहे. दोन्ही बंधूंनी युतीबाबत संकेत दिले असले तरी अद्याप थेट भाष्य केलेले नाही. मात्र आज पहिल्यांदाच उबाठा खासदार संजय राऊत जाहीरपणे म्हणाले की, मुंबई , ठाणे, कल्याण-डोंबिवली, नाशिक या पालिकांच्या निवडणुका ठाकरे बंधू एकत्र लढणार आहेत.**



■ नाशिक

**संजय** राऊत आज नाशिक दौऱ्यावर होते. यावेळी झालेल्या पत्रकार परिषदेत त्यांनी वेगवेगळ्या मुद्यावर भाष्य केले. ते म्हणाले की, ठाकरे बंधू एकत्र येऊन मुंबई महापालिका जिंकणार आहेत. नाशिकमध्येसुद्धा आम्ही एकत्र लढणार आहोत. ठाणे, कल्याण-डोंबिवली आदी अनेक महापालिकांत आम्ही एकत्र लढू. या प्रकरणी आमची चर्चा सुरू आहे. राज आणि उद्धव ठाकरे यांची ताकद म्हणजे मराठी माणसाच्या एकजुटीची ताकद आहे. आता कोणतीही दुसरी ताकद किंवा अघोरी शक्ती आली, तरी मराठी माणसाची वज्रमूठ तोडू शकत नाही.

ते पुढे म्हणाले की, महाराष्ट्र दुर्बल आणि कमकुवत व्हावा यासाठी दिल्लीतून प्रयत्न सुरू आहेत. पंतप्रधान नरेंद्र मोदी, केंद्रीय गृहमंत्री अमित शहा आणि

» पान ७ वर

# दिवाळीत जीएसटी कमी करणार! मोदींची घोषणा

## तरुणांना पहिल्या नोकरीसाठी १५ हजार रुपये विद्यावेतन



**देशाच्या ७९ व्या स्वातंत्र्य दिनानिमित्त आज लाल किल्ल्यावर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते ध्वजारोहण पार पडले. याप्रसंगी मोदी यांनी प्रथमच पूर्ण भगवा फेटा घालून देशवासीयांना संबोधित केले. त्यांनी दोन महत्त्वाच्या घोषणा केल्या की, खासगी क्षेत्रात पहिली नोकरी करणाऱ्या तरुण-तरुणींना सरकारकडून दरमहा १५ हजार रुपये विद्यावेतन दिले जाईल. त्याचबरोबर महत्त्वाचे म्हणजे वस्तू आणि सेवा कराच्या (जीएसटी) रचनेत मोठी सुधारणा करण्यात येणार आहे. पंतप्रधान म्हणाले की, दिवाळीत जनतेला ही मोठी भेट मिळणार असून त्यांच्यावरील कराचे संकट मोठ्या प्रमाणात कमी होणार आहे.**

■ नवी दिल्ली

**जीएसटीमध्ये** सुधारणा करण्याबाबत बोलताना मोदी म्हणाले की, आम्ही सलग आठ वर्षे जीएसटी कमी करण्यासाठी काम केले आहे. आता यात सुधारणा करणार आहोत ज्यामुळे या दिवाळीत आपण खरेदी केलेल्या आणि दैनंदिन वापरल्या जाणाऱ्या वस्तू खूप स्वस्त होतील. त्यामुळे देशाच्या अर्थव्यवस्थेला चालना मिळेल.

सन २०४७ पर्यंत देशाला विकसित राष्ट्र बनवण्याचा निर्धार मोदी यांनी पुन्हा एकदा व्यक्त केला. २०४७ पर्यंत आपल्याला भारताला विकसित राष्ट्र बनवायचे आहे. त्यासाठी केंद्र सरकार वेगवेगळ्या उपाययोजना राबवत आहोत. या योजनांची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी एक टास्क फोर्स तयार करण्यात आला आहे,असे मोदींनी सांगितले.

अणुबॉम्बचा वापर करण्याची वारंवार धमकी देणाऱ्या पाकिस्तानला मोदींनी नाव न घेता सज्जड इशारा दिला. शत्रू देश अणूबॉम्ब टाकण्याची धमकी देऊन ब्लॅकमेलिंग करण्याचा प्रयत्न करत आहे. आम्ही हे कदापि सहन करणार नाही. दहशतवादी कृत्यांमध्ये सामील असणारे आणि दहशतवादाला खतपाणी घालणारे अशा दोघांनाही एकाच नजरेने पाहिले जाईल. त्यांच्याविरोधात सैन्य दलांना खुली सूट असेल. आजवर खूप सहन केले, यापुढे सहन करणार नाही,असे मोदी यांनी ठणकावून सांगितले.

सिंधू पाणीवाटप करारावरून थयथयाट करणाऱ्या पाकिस्तानलाही मोदी यांनी इशारा दिला की, यापुढे रक्त आणि पाणी एकत्र पाहणार नाही. जोपर्यंत पाकिस्तानकडून भारताविरोधातील कुरापती थांबणार नाहीत तोपर्यंत सिंधू जलकरार स्थगितच ठेवला जाईल. वर्षानुवर्षे आपण आपल्या हिश्श्याचे पाणी पाकिस्तानला देत आलो आहोत. भारतात उगम पावणाऱ्या नद्यांच्या पाण्यावर आपल्या शत्रू देशातील शेतकरी पिके घेत आहेत. दुसरीकडे आपल्या देशातील शेतकरी दुष्काळाचा सामना करत आहेत. माझ्या

» पान ७ वर

### जीएसटी दर कमी करा! काँग्रेसची सततची मागणी

वस्तू व सेवा कर अर्थात जीएसटी प्रणाली सर्वात आधी काँग्रेसने आणली. देशात एकच कर योजना असावी हा त्यांचा हेतू होता. यानंतर सर्वांना एकच १८ टक्के जीएसटी लागू व्हावा हा काँग्रेसचा प्रस्ताव होता. दरम्यान केंद्रात मोदी सरकार आले. यावेळी पंतप्रधान मोदी यांचे प्रमुख आर्थिक सल्लागार अरविंद सुब्रमण्यम यांनी सर्व वस्तूंवर एकच १५.५ टक्के जीएसटी लागू करावा, असा सल्ला दिला. हा सल्ला मान्य झाला नाही. मोदींनी १ जुलै २०१७ रोजी जीएसटी लागू केला, पण त्यात एकच कर प्रणाली हा महत्त्वाचा उद्देशच ठेवला नाही. मोदी सरकारने ०.२५ टक्के, ३ टक्के, ५ टक्के, १२ टक्के, १८ टक्के, २८ टक्के आणि ४० टक्के असे कराचे स्लॅब तयार केले. बहुतांश वस्तूंवर १८ आणि २८ टक्के जीएसटी लागू झाला. यामुळे जीएसटीचा एकच कराचा मूळ उद्देश तर साकारला नाहीच, पण भरमसाठ करामुळे व्यापाऱ्यांचे कंबरडे मोडले. मोदी सरकारने निदान दोन कराचेच टप्पे ठेवावे, अशी विनंती काँग्रेसने सतत केली. जीएसटीचे अनेक स्लॅब ठेवल्याने जीएसटी चोरीही वाढली. या देशात कर भरणाऱ्यांची संख्या कमी आहे. पण गरीब, मध्यमवर्ग आणि श्रीमंत सर्वांनाच जीएसटीचा भार सोसावा लागतो. शाळेची पाठ्यपुस्तके, गणवेष यावरही जीएसटी आहे. मध्यमवर्ग व गरीबांना जीएसटी भरावा लागतो. यामुळे नाराजी पसरली होती. जीएसटीचे दर आणि स्लॅब दोन्ही कमी करावे, अशी मागणी काँग्रेस सातत्याने करीत आहे. अखेर दबावामुळे भाजपाने जीएसटीत सुधारणा करण्याची घोषणा केली आहे.

## बिटकॉईनचा नवा विक्रम किंमत १.०८ कोटींच्या पुढे



■ वॉशिंग्टन

**जगातील** सर्वात प्रसिद्ध आणि महागडी क्रिप्टोकरन्सी बिटकॉईनने पहिल्यांदाच १.०८ कोटी रुपयांचा टप्पा ओलांडला आहे. २००९ मध्ये जवळजवळ शून्य किमतीपासून सुरू झालेला बिटकॉईनचा प्रवास आज डिजिटल संपत्तीच्या सर्वोच्च शिखरावर पोहोचला आहे.

अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी क्रिप्टोला अनुकूल धोरणे राबवली असून, बँकांना क्रिप्टो कंपन्यांसोबत व्यवहार करण्याची परवानगी देण्यात आली. या पार्श्वभूमीवर मोठ्या गुंतवणुकदारांनी बिटकॉईनमध्ये अब्जावधी रुपयांची गुंतवणूक केली. परिणामी, गेल्या एका वर्षातच बिटकॉईनच्या किमतीत तब्बल ५७ लाख रुपयांची वाढ झाली आहे. तज्ज्ञांच्या मते, २००९ मध्ये फक्त १ रुपयाची गुंतवणूक केली असती, तर आज ती १ कोटी रुपयांहून अधिक झाली असती.

बिटकॉईनची निर्मिती २००९ मध्ये सातोशी नाकामोटो या गूढ नावाने ओळखल्या जाणाऱ्या व्यक्तीने केली.

सुरुवातीला त्याचे बाजारमूल्य शून्याच्या जवळ होते. २०१० मध्ये बिटकॉईनची किंमत प्रथमच ८.७ रुपये झाली. त्यानंतर वाढीचा वेग कायम राहिला. २०१३ मध्ये ही किंमत सुमारे ८७ हजार रुपयांवर गेली आणि आज २०२५ मध्ये ती विक्रमी १.०८ कोटी रुपयांवर पोहोचली आहे.

## गडचिरोलीच्या अबुजमाडमध्ये पहिल्यांदाच स्वातंत्र्यदिन साजरा

■ गडचिरोली

**नक्षलग्रस्त** म्हणून ओळखल्या जाणाऱ्या दुर्गम भागातील अबुजमाडच्या कवंडे गावात यावेळी पहिल्यांदाच स्वातंत्र्यदिन साजरा झाला आहे. नक्षलप्रभावीत असलेल्या या भागात याआधी स्वातंत्र्यदिनावर बहिष्कार टाकत काळे झेंडे लावले जात असत. या ठिकाणी नव्याने उभारलेल्या पोलीस चौकीत आज ध्वजारोहण पार पडले.

कवंडे या एकेकाळी नक्षलींचा गड असलेल्या गावातच हा स्वातंत्र्यदिन साजरा करण्यात आला. ज्या ठिकाणी काही वर्षांपूर्वी काळे झेंडे व लाल फलक दिसत, त्याच ठिकाणी जन गण मनचे सूर कानी पडले. भामरागड तालुक्यातील कवंडे या घनदाट जंगलातील नव्याने तयार करण्यात आलेल्या पोलीस पोस्टच्या प्रांगणात हा दिवस साजरा करण्यात आला. या पोलीस चौकीची उभारणी केवळ ४८ तासांत करण्यात आली आहे. या ठिकाणी वायफाय, जलशुद्धीकरण व बुलेटप्रुफ कुंपण उभारण्यात आले आहे.

## स्वातंत्र्यदिनी ६ ठिकाणी आत्मदहनाचा प्रयत्न

■ मुंबई

**स्वातंत्र्य** दिनाच्या दिवशी देशभरात स्वातंत्र्याचा उत्सव साजरा झाला. मात्र बुलडाणा, धुळे, सोलापूर, इंदापूर, वर्धा आणि मुंबईतील मंत्रालयासमोर प्रशासनाच्या कार्यपद्धतीवर प्रश्नचिन्ह उपस्थित करून संताप व्यक्त करीत आत्मदहनाचे प्रयत्न झाले. जमिनीचे वाद, अन्याय, थकीत देयके आणि न्याय मिळविण्याच्या मागण्यांसाठी हा प्रकार झाला. परंतु सतर्क पोलिसांनी वेळेवर हस्तक्षेप केल्याने अनर्थ टाळला.

मुंबईत मंत्रालयाबाहेर नाशिकच्या अंबड भागातील काही नागरिकांनी आत्मदहनाचा प्रयत्न केला. नाशिक महानगरपालिकेच्या जागेवरील अतिक्रमणावर कारवाई न झाल्याच्या निषेधार्थ हे आंदोलन झाले. आंदोलकांनी आरोप केला की, नऊ महिन्यात ५० पेक्षा जास्त अर्ज देऊनही प्रशासन गप्प आहे. बुलडाणा जिल्ह्यात आंधरुड येथे शेवंताबाई बनसोडे या महिलेने अतिक्रमण प्रकरणात न्याय मिळत नसल्याच्या कारणाने जिल्हाधिकारी कार्यालयासमोर आत्मदहनाचा



प्रयत्न केला. धुळे येथे जिजामाता कन्या छात्रालयातील एका विद्यार्थिनीसाठी न्यायाची मागणी करत असलेल्या तिच्या आईने अंगावर पेट्रोल टाकून आत्मदहनाचा प्रयत्न केला. प्रशासन व मंत्र्यांनी मुलीला न्याय द्यावा व दोषींवर कारवाई करण्याची

» पान ७ वर

## मनोज जरांगेंची प्रकृती बिघडली



■ नांदेड

**मराठा** आरक्षणासाठी पुन्हा एकदा लढाईचे रणशिंग फुंकणारे मनोज जरांगे यांची प्रकृती आज अचानक बिघडली. त्यांच्यावर रुग्णालयात उपचार सुरू आहेत. नांदेडच्या दौऱ्यावर असताना त्यांना पोटदुखीचा त्रास जाणवला. तत्काळ त्यांना नांदेडच्या शासकीय विश्रामगृहात नेऊन डॉक्टरांकडून तपासणी करण्यात आली. सध्या त्यांच्यावर उपचार सुरू असून प्रकृती स्थिर आहे.

मराठा आरक्षणासाठी मनोज जरांगे यांनी पुन्हा एकदा सरकारला अल्टिमेटम दिला आहे. येत्या २९ ऑगस्टला मुंबईत आल्यानंतर कोणत्याही परिस्थितीत मागे हटणार नसल्याचा इशारा त्यांनी दिला आहे. दरम्यान, मराठा आंदोलक मनोज जरांगे यांच्या कायद्याच्या चौकटीत बसणाऱ्या मागण्यांना आपले नेहमीच समर्थन असल्याची भूमिका भाजपा नेत्या आणि पर्यावरण मंत्री पंकजा मुंडे यांनी व्यक्त केली आहे.

## मांसबंदीविरोधात कोंबडी मोर्चा जलील-आव्हाडांची मटण पार्टी

■ कल्याण

**स्वातंत्र्यदिनानिमित्त** आज कल्याण-डोंबिवली, नागपूर, अमरावती, मालेगाव आणि छत्रपती संभाजीनगर या महापालिकांनी मांसविक्रीवर बंदी घातली होती. या निर्णयाविरोधात कल्याण-डोंबिवलीत पालिकेविरोधात कोंबड्या घेऊन आंदोलन करण्यात आले. या निर्णयाचा विरोध करत शरद पवार गटाचे आमदार जितेंद्र आव्हाड यांनी कल्याणमधील एका हॉटेलमध्ये मांसाहारी जेवण केले, तर एमआयएम खासदार इम्तियाज जलील यांनी त्यांच्या घरी मटण पार्टीचे आयोजन केले.

कल्याण-डोंबिवली महापालिकेने स्वातंत्र्यदिनी मटण-मांस विक्रीबंदीचा निर्णय मागे न घेतल्याने आज सकाळी हिंदू खाटिक समाज, धर्मवीर खाटिक समाज संस्था, काँग्रेससह विविध सामाजिक संस्थांनी महापालिकेवर



मोर्चा काढून जोरदार निदर्शने केली. आंदोलकांनी पालिकेसमोर हातात जिवंत कोंबड्या घेऊन, कोंबडा पहाटे जाग आणतो, तसेच चुकीच्या

» पान ७ वर

## मेहुल चोक्सीची सुनावणी बँकांच्या सहभागास परवानगी

■ मुंबई

**कोट्यवधी** रुपयांचा आर्थिक गैरव्यवहार करुन फरार झालेला हिरेव्यापारी मेहुल चोक्सी याच्या सुनावणीवेळी व्यवहाराशी संबंधित दोन्ही बँकांना उपस्थित राहण्याची परवानगी देण्यात आली आहे. विशेष पीएमएलए न्यायालयाने आयसीआयसीआय व पंजाब नॅशनल बँक या दोन्ही बँकांना या सुनावणीत सहभागी होण्याची परवानगी दिली.

या दोन्ही बँकांनी पक्षकार होऊन आपले म्हणणे मांडण्याची परवानगी देण्यात आली असून या दोन्ही बँकांनी आरोपीकडून जीएसटीची

» पान ७ वर

## पिंपरी-चिंचवडमध्ये ड्रेनेजमध्ये उतरलेल्या ३ कामगारांचा मृत्यू

■ पुणे

**पिंपरी-चिंचवडमधील** निगडी प्राधिकरणात बीएसएनएल चेंबरमध्ये केबल टाकण्याच्या कामादरम्यान झालेल्या दुर्घटनेत तीन कामगारांचा मृत्यू झाला. मृतांमध्ये लखन ढावरे, दत्ता होनाले आणि दादासाहेबराव गिरसेट यांचा समावेश असून, हे तिघेही बीएसएनएलसाठी काम करणारे कंत्राटी कर्मचारी असल्याची माहिती आहे. चौथा कामगार बाबासाहेब वाघ यांचा जीव थोडक्यात बचावला असून त्यांच्यावर लोकमान्य हॉस्पिटलमध्ये उपचार सुरू आहेत. बीएसएनएलच्या इन्स्पेक्शन चेंबरमध्ये ऑप्टिकल फायबरचे काम करताना दुपारच्या वेळी निगडी प्राधिकरण सेक्टर क्रमांक २७, प्लॉट क्रमांक ६५ समोर रस्त्याच्या कडेला असलेल्या बीएसएनएलच्या चेंबरमध्ये ही हृदयद्रावक घटना घडली. याबाबत बाबासाहेब वाघ यांनी सांगितले की, आम्ही चौघेजण चेंबरमध्ये वायर काढण्याचे काम करत होतो. आधी लखन ढावरे खाली उतरले. त्यांना श्वास घेण्यास त्रास होऊ लागला. त्यांना वाचवण्यासाठी दत्ता होनाले उतरले, पण त्यांनाही तसाच त्रास झाला. त्यानंतर दादासाहेबराव गिरसेट खाली उतरल्यावर तेही बेशुद्ध पडले. मी मदतीसाठी ओरडलो. लोकांनी धाव घेत तिघांना बाहेर काढले, मात्र तोपर्यंत त्यांचा मृत्यू झाला होता.

## किश्तवाडमध्ये मृतांचा आकडा ६५ अनेकजण जखमी ! शेकडो बेपत्ता

### मचैल माता यात्रेवेळी ढगफुटीचा कहर



■ किश्तवाड

**जम्मू** आणि काश्मीरच्या किश्तवाड जिल्ह्यातील चाशोटी गावात मचैल माता यात्रेदरम्यान काल दुपारी झालेल्या ढगफुटीमुळे आतापर्यंत ६५ जणांचा मृत्यू झाला आहे. या दुर्घटनेत अनेकजण जखमी झाले असून शेकडो लोक अजूनही बेपत्ता आहेत. दुसऱ्या दिवशीही येथे स्थानिक प्रशासनासह एनडीआरएफ, एसडीआरएफ, लष्करी पथकांकडून बचावकार्य सुरू आहे.

या ढगफुटीनंतर आलेल्या पुरात तात्पुरते तंबू, लंगर, दुकाने आणि वाहने वाहून गेली आहेत. १६ घरे, ३ मंदिरे, सरकारी इमारती, पाणचक्क्या आणि एक पूल नष्ट झाला आहे. संपूर्ण परिसरात वीज आणि दूरसंचार सेवा खंडित झाली आहे. खराब हवामानामुळे हेलिकॉप्टर मदतकार्यात अडथळे येत आहेत. चाशोटी हे मचैल माता मंदिराकडे जाणाऱ्या मार्गावरील शेवटचे वाहनसुलभ गाव होते. ही यात्रा २५ ऑगस्ट ते ५ सप्टेंबरपर्यंत

» पान ७ वर

## विदर्भ आणि मराठवाड्यात मुसळधार पावसामुळे पूरस्थिती

■ नागपूर

**राज्याच्या** अनेक भागांत गेल्या चोवीस तासांत मुसळधार पावसाने कहर केला असून विदर्भ - मराठवाड्यात काही ठिकाणी ढगफुटीसदृश परिस्थिती निर्माण झाली.

जालना हिंगोलीमध्ये पावसाने थैमान घातले. जालन्यात परतूर तालुक्यातील श्रीष्टी परिसरात काल मध्यरात्रीपासून संततधार पाऊस झाला. अचानक झालेल्या या पावसामुळे कसुरा नदीला पूर आला असून नदीवरील पुलावरून पाणी वाहू लागले आहे. परिणामी परतूर-आष्टी मार्गावरील वाहतूक आज पूर्णपणे ठप्प झाली. शेत शिवारांमध्ये पाणी शिरल्याने उभी पिके पाण्याखाली गेली आहेत. खरिपाच्या सोयाबीन, कापूस आणि मूग यांसारख्या पिकांना पावसाचा फटका बसला आहे.

नांदेड जिल्हयातही पावसाचा जोर कायम आहे. कंधार तालुक्यातील तैलूर-कौठा नदीला आलेल्या पुरामुळे हा मार्ग वाहतुकीसाठी बंद करण्यात आला. अनेक

» पान ७ वर

## शक्तिपीठ महामार्गाविरोधात कोल्हापुरात शेतात ध्वजारोहण

### भुदरगड, कागल तालुक्यात आंदोलन



■ कोल्हापूर

**नागपूर** ते गोवा प्रस्तावित शक्तिपीठ महामार्गाला महाराष्ट्रातील बारा जिल्ह्यांमधील शेतकऱ्यांकडून तीव्र विरोध होत आहे. महायुती सरकार जबरदस्तीने हा महामार्ग लादण्याचा प्रयत्न करत असल्याचा आरोप काँग्रेसचे विधान परिषदेचे आमदार सतेज पाटील यांनी केला आहे. स्वातंत्र्यदिनी जिल्ह्यातील भुदरगड आणि कागल तालुक्यांमध्ये शेतकऱ्यांसोबत त्यांनी प्रत्यक्ष शिवारात जाऊन आंदोलन केले. शेतामध्ये तिरंगा फडकावत त्यांनी शेतकऱ्यांसोबत खर्डा-भाकर खाऊन शक्तिपीठ महामार्ग रद्द करण्याची मागणी केली.

शेतकऱ्यांनी तिरंगा आमच्या वावरात शक्तिपीठ नको शिवारात, जमीन आमच्या हक्काची, नाही कुणाच्या बापाची अशा सरकारविरोधी घोषणा दिल्या. याशिवाय हातकणंगले आणि शिरोळ

» पान ७ वर

# छोट्या जाहिराती
संपर्क करा
८४२२८१७४४५/८१०८११६४२३

## पाहिजेत

इमिटेशन ज्वेलरीसाठी मुली पाहिजे. **7023506405** {NC251922}

**9869028742** घरी जेवणाकरिता बाई पाहिजे ग्रान्ट रोड ईस्ट मुंबई नं.8 {NC251932}

अर्धवेळ काम- ज्येष्ठ नागरिक, गृहिणी, पोलीस व इतर निवृत्तांसाठी : **9821239057** {NC251969}

पेस्ट कंट्रोल कंपनी मुंबई, ठाणे, डोंबिवली करिता टेक्निशियन, टेली कॉलर, सेल्समन आणि लायसन्स ऑफिसर, ऑपरेटर पाहिजेत : **9323682041** आकर्षक वेतन. {NC251959}

हाँगकाँगमध्ये लहान मुलाला सांभाळण्यासाठी व जेवण बनवण्यासाठी बाई पाहिजे **9833432953** {NC251972}

अंधेरीमधील लॉजिस्टिक कंपनीला डिलीव्हरीबॉईज पाहिजेत.पगार 16000/- ते 20000/- वयोमर्यादा 18 ते 32 वर्षे शिक्षण-दहावी. अंधेरी जवळपास राहणाऱ्यांना प्राधान्य,संपर्क करा - **मॅक्स कुरीयर एन्ड कार्गो,**गाळा नं. 28, मखारिया इंडस्ट्रीयल कॉम्प्लेक्स, पेपर बॉक्सजवळ,अंधेरी (पुर्व) मुंबई-400093 फोन - **9320101188** {NC251971}

बोरिवली पश्चिम येथे हायड्रॉलिक प्रेसच्या सर्विस आणि रिपेअरिंगसाठी हायड्रोलिक इंजिनिअर/वर्कर पाहिजेत. **9820477791** {NC251770}

बोरिवली पश्चिम येथे कारखान्यात डाय मेकर कारागीर आणि मदतनीस पाहिजेत. **9820477791** {NC251769}

## पाहिजेत

पॉवरप्रेस ऑपरेटर आणि पॅकिंगसाठी मुले/मुली पाहिजे. जय गणेश, गाळा नंबर - 6, बबन मिश्रा कंपाऊंड सोनावाला क्रॉस रोड नंबर 2, गोरेगांव (पूर्व) - **9820382105 / 9137518551** {NC251687}

वकिलाच्या ऑफिसमध्ये कामासाठी मुले पाहिजे. 32 च्या आत मध्ये भांडुप संपर्क करावा **9892769253** {NC251895}

मरीनलाईन्स स्टेशनजवळ ऑफिस असिस्टंट SSC मुली पाहिजे. (वय 18-25) पगार 15,000/- संपर्क - **9820338880** {NC251909}

**पाहिजेत**
पेण-खोपोली रोडवर असलेल्या फळबागायतीकरिता काम करण्यास अनुभवी माणसे पाहिजेत.
- जोडप्यांना प्राधान्य.
- राहण्याची सोय आहे.

संपर्क : 8108713032

कांदिवली वेस्टला म्युच्युअलफंड, विमा व्यवसायाच्या, बिझनेस डेव्हलोपमेटसाठी अनुभवी सेल्समेन फिल्डवर्क कामासाठी पाहिजे. अभय - **9223481847** {NC251903}

त्वरित पाहिजे आहे कंपनीसाठी हुशार अनुभवी, विश्वासू, तरुण-प्यून, सायकल चालवता येणे आवश्यक. पत्ताः ए टु झेड स्टिलॉइस प्रायव्हेट लिमिटेड, २९, मॅगझिन स्ट्रीट, संगम हॉटेलजवळ दारूखाना, रे रोड, मुंबई - ४०००१०. दुरध्वनी :- **7021734143** {NC251977}

## पाहिजेत

फ्रि रजिस्ट्रेशन, घरकाम/ऑफिस/टायपिंग कामासाठी मुलगी/बाई पाहिजे. **9082131545** {NC251976}

मुंबईमध्ये एका माणसाचे जेवण बनवण्यासाठी महिला पाहिजेत. जातीची अट नाही. गरीब निराधार महिलांना पहिली प्राथमिकता राहण्याची जेवणाची सोय. मुंबई - **9324774986** {NC251975}

अंधेरी येथे सुरक्षारक्षक पाहिजेत. पगार 26219/- + अधिक सुविधा. **9224216144 / 9869576582** {NC251973}

मुंबई सेंट्रल - DRM ऑफिस साफसफाई करिता माणसं पगार 12000/- पास फ्री. आधारकार्ड / रेंट ॲग्रीमेंट / ॲड्रेसप्रुफ - सकाळी 7 - 4. - मोबाईल - **9324681781** {NC251984}

## Situation Vacant

REQUIRED MALE/ FEMALE OFFICE ASSISTANT (EXCEL & WORD) AT MIRAROAD FOR PVT. LTD. FIRM **8097641616.** {NC251963}

Required a Sales & Accounts Helper for Apple Gift at 122/124 Abdul Rehman st. Mumbai 03. Mob. **8879924269** {NC251963}

Required Part Time Office Assistant with Tally Dadar office. **9833224522** {NC251943}

Borivali (West) required Assistant Tally Accountant 2 years' experience. Resume : **9892797851.** {NC251924}

Wanted Peon, computer operator, Accountant retired person, students, male female **9167683051** {NC251982}

## शैक्षणिक

हमखास पासाची गॅरंटी खर्डीकर क्लासेस. ७वी नापास? डायरेक्ट १०वी. ११वी नापास? डायरेक्ट १२वी. डोंबिवलीः **9820627580 / 9820904646** {NC251851}

## नर्सिंग कोर्स

गव्हर्नमेंट मान्यता, 10वी/12वी पास नापास मुले-मुलींसाठी पेशंटकेअर / डिप्लोमा पेशंट केअर/मेडिकल लॅबोरेटरी / DMLT/X-RAY टेक्निशियन / ऑपरेशन थिएटर / Physiotherapy कोर्स करिता संपर्क : Dr. SHRIVASTAV :- **9769116609 / 9702029738** LMP Paramedical Institute. Borivali West {NC251485}

100% नोकरी देणारे गव्हरमेंट कोर्सेस GNM/ Diploma NURSING, DMLT, PHYSIOTHERAPY, OPERATION THEATRE, INTENSIVE CARE UNIT, XRAY, DIALYSIS ओम इन्स्टिट्यूट, मालाड, मुंबई **8080502190 / 8850530054** {NC250612}

## व्यवसायविषयक

पॅम्पलेट वाटण्यासाठी एक पार्टटाईम माणूस ठेवा आणि लाखो रुपये कमवा. डॉ. महादेव कोकाटे - **9588641225** {NC251964}

छोटी इन्व्हेस्टमेंट आणि प्रत्येक महिना फिक्स इन्कम मिळवा, कायदेशीर व्यवहार, संपर्क साधा :- **8452810618** {NC251968}

''घरातुन बिजनेस'' Part Time Work - Full Time Income.. दीप्ती **9429991857** {NC251880}

होलसेल्स-बाईक्स, जीप्स, (चार्जिंग + लाईट्स + पंखे), (हॅवेल्स), स्टिल्स, फाइबरग्लास - **9891053355** {NC251978}

## वधूवर मेळावा

वधु वर मेळावा सर्वजाती मुलींना फ्री APP कल्याण **9869868620** {NC251837}

**वाचकांना सूचना**
दैनिक 'नवाकाळ' वर्तमानपत्रात प्रसिद्ध झालेल्या जाहिरातींच्या सत्यतेबाबत दैनिक 'नवाकाळ'ची कोणतीही जबाबदारी नाही. वाचकांनी स्वतः पडताळणी करून स्वतःच्या जबाबदारीने निर्णय घ्यायचा आहे, याची नोंद घ्यावी.- **मॅनेजर, 'नवाकाळ'**


## आजचे राशी भविष्य

शनिवार दि. १६ ऑगस्ट २०२५

ज्योतिष पंडीत अर्चना तारू

| | |
|---|---|
| मेष | समाजामध्ये मानसन्मान वाढीस लागेल. आत्मविश्वासाने कार्यरत राहाल. कौटुंबिक वातावरण आनंददायी राहील. |
| वृषभ | कामामध्ये प्रगती होईल. मानसिक शांतता व समाधान लाभेल. मित्रांसोबत वेळ चांगला जाईल. वरिष्ठांकडून कौतुक होईल. |
| मिथुन | सामाजिक कार्यात सहभागी व्हाल. स्वतःसाठी व कुटुंबीयांसाठी अधिक खर्च कराल. स्वादिष्ट भोजनाचा आस्वाद घ्याल. |
| कर्क | उत्साहपूर्ण व आनंददायी दिवस राहील. कुटुंबामध्ये खेळीमेळीचे वातावरण राहील. मित्रमंडळींसमवेत वेळ मजेत घालवाल. |
| सिंह | समाजामध्ये प्रतिष्ठा व मानसन्मान मिळेल. तुमच्या बोलण्याचा प्रभाव पडेल. व्यवसायामध्ये आर्थिक उन्नती होईल. |
| कन्या | उत्साहाने सामाजिक कार्यात सहभागी व्हाल. नवीन मित्र जोडले जातील. आरोग्याच्या किरकोळ तक्रारी राहतील. |
| तूळ | व्यवसायामध्ये आर्थिक लाभ चांगले मिळतील. सामाजिक कार्यात प्रसन्नता वाटेल. कौटुंबिक वातावरण आनंददायी राहील. |
| वृश्चिक | व्यवसायामध्ये शत्रूंवर मात करण्यात यशस्वी व्हाल. मित्रमंडळींमध्ये आनंदाने दिवस घालवाल. घरात धार्मिक वातावरण राहील. |
| धनु | सामाजिक कार्यात दानधर्म कराल. घरामध्ये धार्मिक कार्याचे आयोजन कराल. कुटुंबियांसमवेत दिवस मजेत घालवाल. |
| मकर | उत्साहाने कार्यरत राहाल. जोडीदार आणि मित्रांकडून सहकार्य मिळेल. छोटा प्रवास घडू शकतो. आरोग्य सांभाळा. |
| कुंभ | अधिक उत्साहाच्या भरात अति मेहनत कराल. सामाजिक कार्यात रस घ्याल. मित्रमंडळींच्या भेटण्याने आनंद मिळेल. |
| मीन | तुमच्या बोलण्याचा इतर लोकांवर प्रभाव पडेल. घरामध्ये धार्मिक कार्यात रमाल. जोडीदार व मुले यांच्या समवेत वेळ आनंदात घालवाल. |

## शुभ राशी दि. १६/०८/२०२५

| | | |
|---|---|---|
| ४ | ० | ५ |
| ४३ | ०९ | ५३ |
| ४८ | ०८ | ५८ |
| १३० | १३६ | १६८ |
| २४८ | ३८९ | २३० |

# इंडोनेशियामध्ये जेवणातून ३६० हून अधिक लोकांना बाधा

■ जकार्ता



**इंडोनेशियातील** मध्य जावामधील स्त्रागेन शहरात सरकारी योजनेतून दिल्या जाणाऱ्या मोफत जेवणातून ३६० हून अधिक लोकांना बाधा झाल्याने एकच गोंधळ उडाला. अन्नाचे नमुने प्रयोगशाळेत पाठवण्यात आले असून निकाल येईपर्यंत त्या स्वयंपाकघरातून अन्न वितरण तात्पुरते थांबवण्यात आले आहे. या प्रकरणी कोणी दोषी आढळल्यास त्यांच्यावर कारवाई करण्यात येणार असल्याचे सरकारी अधिकाऱ्याने सांगितले. जेवण खाल्ल्यामुळे लोकांना डोकेदुखी आणि जुलाबाचा त्रास होता. त्यानंतर त्यांना रुग्णालयांत दाखल करण्यात आले. त्यांच्यावरील वैद्यकीय उपचारांचा खर्च सरकार देणार आहे. मोफत जेवणाची योजना सरकारी आहे. याचा विस्तार आतापर्यंत १५ दशलक्षहून अधिक लोकांपर्यंत करण्यात आला.

वर्षाअखेरीस ही संख्या ८३ दशलक्षपर्यंत पोहोचण्याची योजना आखली. यावर्षी या योजनेवर एकूण १७१ ट्रिलियन रुपया (१०.६२ अब्ज) खर्च अपेक्षित आहे.

# गरबा क्लासेसचे फॅड बंद करा गुजरातमध्ये भाजपा नेत्यांची मागणी

■ अहमदाबाद

**नवरात्रोत्सव** अवघ्या दीड महिन्यावर आला असताना गुजरातमध्ये उत्सवाच्या काही दिवस आधी जागोजागी सुरू होणाऱ्या गरबा क्लासेसच्या मुद्यावरून गदारोळ माजला आहे. पाटीदार समाजाचे नेते आणि पाटीदार युवा सेवा संघचे संस्थापक मनोज पिनारा यांनी नुकत्याच आयोजित केलेल्या जनक्रांती सभेत गरबा क्लासच्या मुद्यावर जोरदार चर्चा झाली. उपस्थित जवळपास सर्वच प्रमुख सामाजिक कार्यकर्त्यांनी आणि भाजपा आमदारांनी गरबा आणि दांडीया क्लासेसवर बंदी घालण्याची मागणी केली. सुरुवातीला सांस्कृतिक देवाण-घेवाण म्हणून पाहिल्या जाणाऱ्या गरबा क्लासेसनी बघता बघता व्यवसायाचे स्वरूप घेतले आहे.

देश विदेश

# जन्मदर वाढवण्यासाठी तैवान सरकारची नवी योजना

■ तैपेई सिटी

**जन्मदर** वाढवण्यासाठी आता तैवान सरकारने नवी योजना सुरू केली आहे. या अंतर्गत जन्माला येणाऱ्या प्रत्येक मुलाची जबाबदारी तैवान सरकार घेणार आहे. महिला गर्भवती असल्यापासून ते मुले जन्माला येईपर्यंत होणारा सर्व खर्च देखील तैवान सरकार दाम्पत्याला देणार आहे. तैवानमध्ये जन्मदर कमी झाल्यामुळे मनुष्यबळामध्ये प्रचंड प्रमाणात घट झाली, लोकसंख्या वाढवून मनुष्यबळाची कमतरता दूर करण्यासाठी तैवान सरकारने हे पाऊल उचलले आहे. तैवानमधील जे दाम्पत्य मुले जन्माला घालण्यासाठी आयव्हीएफ ट्रीटमेंटची मदत घेणार आहे, अशा दाम्पत्याला तैवान सरकारकडून ६ लाख रुपये मिळणार आहेत. यापूर्वी सरकार ३ लाख रुपये देत होते. याबाबतच्या प्रस्तावाला लवकरच तैवान मंत्रिमंडळामध्ये मंजुरी दिली जाणार आहे.

# प.बंगालमध्ये परिचारिकेचा मृत्यू! भाजपा व कम्युनिस्टांचे आंदोलन

■ कोलकाता




**पश्चिम** बंगालच्या हुगळी जिल्ह्यातील एका खाजगी रुग्णालयातील परिचारिकेने आत्महत्या केल्यानंतर तिला न्याय मिळावा यासाठी भाजपा व कम्युनिस्ट पार्टीच्या कार्यकर्त्यांनी आंदोलन केले. रुग्णालयातील गैरव्यवहारांची माहिती मिळाल्याने तिचा खून करण्यात आल्याचा आरोप तिच्या वडिलांनी केला आहे. तर प्रियकराने लग्नाला नकार दिल्यामुळे तिने आत्महत्या केल्याचे पोलिसांनी म्हटले आहे.

हुगळी जिल्ह्यातील सिंगूर येथील एका खाजगी रुग्णालयातील चौथ्या मजल्यावर एका २४ वर्षीय परिचारिकेचा मृतदेह आढळला होता. त्यानंतर तिच्या वडीलांनी रुग्णालय प्रशासनावर गंभीर आरोप केले आहेत. त्यांनी या मुलीची ऑटोप्सीचे चित्रीकरण करण्याची मागणी केली. रुग्णालयाने आपल्यावरील सर्व आरोप फेटाळले आहेत. प्रियकराने लग्नाला नकार दिल्यामुळे तिने हे पाऊल उचलल्याचे पोलिसांनी म्हटले आहे. दरम्यान, या तरुणीचे शवविच्छेदन होणार असलेल्या रुग्णालयाबाहेर कम्युनिस्ट पक्षाने तीव्र आंदोलन केले.

या रुग्णालयात योग्य त्या सुविधा नसल्याचे त्यांनी म्हटले आहे. ज्याठिकाणी तिचा मृतदेह ठेवण्यात आला होता, त्याठिकाणचा दरवाजा तुटल्याचे आढळल्याचे सीपीएमच्या कार्यकर्त्यांनी म्हटले आहे.

# सुरतमधील पाकिस्तानी मोहल्ला आता हिंदुस्थानी मोहल्ला झाला

■ सुरत

**सुरतमधील** पाकिस्तानी मोहल्ला नावाने ओळखला जाणारा विभाग आता हिंदुस्थानी मोहल्ला झाला आहे. या मोहल्ल्याचे नाव बदलण्याची मागणी अनेक दिवसांपासून होती . ती मान्य झाली असून येथील स्थानिक आमदारांनी या नावाच्या फलकाचे अनावरण केले. आपला पत्ता बदलल्याबद्दल या विभागातील नागरिकांनी आनंद व्यक्त केला आहे.

देशाच्या फाळणीनंतर पाकिस्तानातील अनेक सिंधी कुटुंबीय भारताच्या विविध भागात येऊन स्थायिक झाले. त्यातील काही जण सुरतमध्ये स्थायिक झाले. तेव्हापासून या विभागाला पाकिस्तानी मोहल्ला असे नाव पडले. सध्या इथे जवळजवळ ६०० घरे असून पाच हजारांहून अधिक लोक राहातात. त्यांनी या विभागाचे नाव बदलण्याची मागणी केली होती. त्यानुसार आता सरकारी कागदोपत्रीही या विभागाचे नाव हिंदुस्थानी मोहल्ला असे करण्यात आले आहे.

# ऑस्ट्रेलिया आणि वानुआतुमध्ये १० वर्षांच्या करारावर सहमती

■ सिडनी

**ऑस्ट्रेलिया** आणि वानुआतु या देशांनी सुरक्षा आणि आर्थिक संबंध मजबूत करण्याच्या उद्देशाने ५०० दशलक्ष ऑस्ट्रेलियन डॉलर किमतीच्या १० वर्षांच्या करारावर सहमती दर्शवली आहे. चीनच्या वाढत्या शक्तीला तोंड देण्यासाठी ऑस्ट्रेलिया वानुआतुसह आजूबाजूच्या समुद्र भागात आपला प्रभाव वाढवण्याचा प्रयत्न करत करणार आहे.

हवामान बदलाच्या परिणामांना तोंड देण्यासाठी आणि त्याची सुरक्षा वाढवण्यासाठी सखल बेटावर लाखो रुपये खर्च केले जाणार आहे. राजधानी पोर्ट विला आणि वानुआतुच्या सर्वात मोठ्या बेट सँटो येथे दोन मोठे डेटा सेंटर बांधण्यासाठी निधी पुरवण्यात येणार आहे. वानुआटुचे पंतप्रधान नापत म्हणाले की, या करारामुळे दोन्ही देशांमधील अनेक मोठे फायदे होतील.

# ठाण्यातील लोढा अमारा इमारतीला आग! १ जण ठार

■ ठाणे

**कोलशेत** परिसरातील लोढा अमारा इमारतीच्या २२ व्या मजल्यावर भीषण आग लागून जयश्री ठाकरे (३६) यांचा मृत्यू झाला. अचानक लागलेल्या आगीमुळे परिसरात एकच खळबळ उडाली. आग लागल्याची माहिती मिळताच ठाणे महापालिकेच्या अग्निशमन दलाच्या गाड्या, आपत्ती व्यवस्थापन कक्षाचे कर्मचारी व आपत्ती प्रतिसाद दलाचे जवान घटनास्थळी दाखल झाले. तीन ते चार अग्निशमन गाड्यांच्या मदतीने सलग प्रयत्न करून आग पूर्णपणे विझवण्यात आली. आगीमुळे संपूर्ण २२ व्या मजल्यावरील लॉबी व २२०३ क्रमांकाचा फ्लॅट जळून खाक झाला. मोठ्या प्रमाणात पसरलेल्या धुरामुळे रहिवाशांना श्वास घेण्यास त्रास होऊ लागला.

# लाल किल्ल्यावरून पंतप्रधान पुन्हा खोटे बोलले ! काँग्रेसचा आरोप

■ मुंबई

**प्रचंड** मोठा संघर्ष व हजारो लाखो स्वातंत्र्यसैनिकांनी दिलेल्या बलिदानानंतर देशाला स्वांतत्र्य मिळाले असून काँग्रेसचे नेतृत्व व कर्तृत्व याचे त्यात मोठे योगदान आहे. स्वातंत्र्यासाठी जेव्हा देश लढत होता त्यावेळी जे लोक ब्रिटिशांसोबत होते, पेन्शन घेत होते व ज्या लोकांचा या लढ्यात काहीही सहभाग नव्हता ती शक्ती आज सत्तेवर आहे. लाल किल्ल्यावरून देशाचे पंतप्रधान जे बोलत त्या प्रमाणे वागत होते पण त्याला मागील ११ वर्षात याला बगल देऊन फक्त खोटे बोलले जात आहे. रा. स्व. संघाबद्दल पंतप्रधान आज जे बोलले तेही खोटेच बोलले, असे काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ म्हणाले.

टिळक भवन येथे स्वातंत्र्य दिनाचा कार्यक्रम उत्साहात पार पडला. यावेळी सेवा दलाचे प्रदेशाध्यक्ष विलास औताडे यांच्यासह प्रदेश काँग्रेसचे पदाधिकारी व सेवादलाचे कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. सुरुवातीला काँग्रेस प्रदेशाध्यक्षांनी स्वातंत्र्य दिनाच्या सर्वांना शुभेच्छा दिल्या. ते पुढे म्हणाले की, भारताची फाळणी ही एक दुःखद घटना आहे. पंडित जवाहरलाल नेहरु, सरदार पटेल होते म्हणून देश एकसंघ राहिला नाहीतर ६०० देश झाले असते. फाळणीचे दुःख आहेच पण भाजपा सरकार १३ ऑगस्टला मंत्रालय रात्रभर उघडे ठेवून फाळणीचा दिवस साजरा करण्याचा फतवा काढते, हा काय प्रकार आहे. १९४२ चे चले जाव आंदोलन सुरु होते तेव्हा रा. स्व. संघ, सावरकर कोठे होते, हे पंतप्रधानांनी सांगायला पाहिजे होते. देशाला स्वातंत्र मिळवून देण्यासाठी कोणी मोठी किंमत मोजली हे सर्वांना माहीत आहे. देशात आज बेशिस्त वाढली आहे आणि ती काँग्रेसच दूर करु शकते. देशाचा व काँग्रेसचा डीएनए एकच आहे, असेही सपकाळ म्हणाले. महात्मा गांधी, पंडित नेहरु, सरदार पटेल, सुभाषचंद्र बोस, मौलाना आझाद यांचे आपण पाईक आहोत, त्यांचा वारसा आपण पुढे घेऊन जात आहोत, असेही सपकाळ म्हणाले.

# मीरा-भाईंदरमध्ये प्रथमच स्पेनचे गोविंदा थर लावणार

■ भाईंदर

**मिरा-भाईंदर** शहरात यावर्षी विविध ठिकाणी दहीहंडी उत्सवाचे आयोजन होत असून, बक्षिसांसाठी राजकीय पक्षांमध्ये चुरस लागली आहे. मात्र, यंदा पहिल्यांदाच भाईंदर पूर्वेतील नवघर नाक्यावर होणाऱ्या उत्सवात स्पेनमधील खेळाडू सहभागी होणार आहेत.

प्रताप सरनाईक फाउंडेशन आणि वंदना विकास पाटील जनहित संस्थेतर्फे नवघर नाक्याची मानाची संस्कृतीची दहीहंडी २०२५ मिरा-भाईंदर शहरात साजरी होणार आहे. हा उत्सव भाईंदर पूर्वेतील नवघर मराठी शाळेच्या मैदानात रंगणार आहे. यावेळी स्पेनमधील मॅरॅक्स दे सॉल्ट या संघाचे १११ खेळाडू (कॅसलर) आठ थरांची मानाची हंडी फोडून सलामी देणार आहेत. या भव्य सोहळ्याचे आयोजन महाराष्ट्र राज्य परिवहन मंत्री व ठाणे जिल्हा पालकमंत्री प्रताप सरनाईक यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले आहे.

# कोलगाव ग्रामपंचायत सदस्यांचे भाजपातून ६ वर्षांसाठी निलंबन

■ सावंतवाडी

**पक्षविरोधी** भूमिकेवरून कोलगाव ग्रामपंचायत सदस्य रोहित नाईक, संयोगिता उगवेकर, प्रणाली तिळवे आणि आशिका सावंत यांना भाजपातून सहा वर्षांसाठी निलंबित करण्यात आले आहे. याबाबतची माहिती आंबोली मंडळ अध्यक्ष संतोष राऊळ यांनी प्रसिद्धीपत्रकाद्वारे दिली.

हे सदस्य भारतीय जनता पार्टीचे प्राथमिक सदस्य असून भाजपा पुरस्कृत पॅनेलमधून ग्रामपंचायत सदस्य म्हणून निवडून आले आहेत. अलीकडेच शिवसेना (शिंदे गट) जिल्हाप्रमुख सच्चिदानंद परब यांनी पत्रकार परिषद घेऊन भाजपा जिल्हा सरचिटणीस महेश सारंग आणि पक्षाविरोधात भाष्य केले होते. त्यावेळी संबंधित सदस्यांनी परब यांच्या बाजूला उपस्थित राहून त्यांच्या भाष्याला समर्थन दिल्याचे निदर्शनास आले.

# उत्तर प्रदेशात मंत्र्याचे वाहनच उचलून नेले

■ लखनौ

**उत्तर** प्रदेशात वाहतूक पोलिसांनी थेट एका मंत्र्याचीच गाडी टोईंग करून नेण्यात आली. पावसाळी अधिवेशनादरम्यान हा प्रकार घडला. उत्तर प्रदेश सरकारमध्ये सामील असलेले निषाद पार्टीचे अध्यक्ष व मत्स्यव्यवसाय विभागाचे मंत्री संजय निषाद काल उत्तर प्रदेश विधिमंडळ अधिवेशनासाठी आपल्या कारने आले होते. ते सभागृहात गेल्यानंतर त्यांच्या चालकाने त्यांच्या वाहन विधिमंडळ परिसरात उभे केले. या वाहनामुळे परिसरात वाहतूक कोंडी झाल्यामुळे प्रशासनाने ही गाडी उचलून नेली. सभागृहात विविध विषयांवर चर्चा सुरु असताना थेट मंत्र्याचीच गाडी उचलल्याबद्दल सभागृहाबाहेरही मोठी चर्चा रंगली.

# मुख्यालयी न राहणाऱ्या आश्रमशाळा कर्मचाऱ्यांवर कारवाईचा इशारा

■ मुरबाड

**शहापूर** एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्पांतर्गत येणाऱ्या शासकीय व अनुदानित आश्रमशाळांतील शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी शासन निर्णयानुसार मुख्यालयी वास्तव्यास राहणे बंधनकारक असतानाही प्रत्यक्षात तसे न राहण्याच्या तक्रारी वाढल्या आहेत.

या पार्श्वभूमीवर सर्व संबंधित मुख्याध्यापकांना तातडीने शहानिशा करून अहवाल सादर करण्याचे आदेश देण्यात आले आहेत.

सामाजिक कार्यकर्ते वामन खाकर यांनी २६ जुलै रोजी आपले सरकार पोर्टलवर या संदर्भात तक्रार दाखल केली होती. तक्रारीनुसार, अनेक कर्मचारी खोटे पुरावे सादर करून मुख्यालयी राहत असल्याचे दाखवतात. मात्र ते बाहेर वास्तव्यास असल्याने शासनाची दिशाभूल होते आणि धोरणभंग घडतो. तक्रारीसोबत आदिवासी विकास विभागाचे परिपत्रक जोडण्यात आले आहे, ज्यात कर्मचाऱ्यांनी मुख्यालयी वास्तव्यास असणे अनिवार्य असल्याचे स्पष्ट नमूद आहे. या तक्रारीच्या अनुषंगाने सहाय्यक प्रकल्प अधिकारी डी. डी. काळपांडे यांनी मुख्याध्यापकांना प्रत्यक्ष पडताळणी करून स्वयंस्पष्ट अहवाल सादर करण्याचे निर्देश दिले आहेत. तसेच, नियमांचे उल्लंघन करणारे आणि खोटे पुरावे सादर करणाऱ्यांवर कठोर कारवाई केली जाईल, असा इशाराही आदेशात देण्यात आला आहे.

पनवेल महानगरपालिका
स्थापना - २०१६

# पनवेल महानगरपालिका

## मालमत्ता कर विभाग

अभय योजना

कर MITRA
तुमच्या सर्व प्रश्नांचं समाधान एकाच ठिकाणी!

केवळ एक वेळची विशेष व अंतिम बाब, करदात्यांसाठी सुवर्णसंधी !!!

# अभय योजने अंतर्गत शास्ती माफीला मुदतवाढ

## मालमत्ता कर एकरकमी भरा व शास्तीवर सवलत मिळवा !

१६ ऑगस्ट ते १५ सप्टेंबर २०२५ पर्यंत
शास्ती मध्ये ९०% सवलत.

१६ ते ३० सप्टेंबर २०२५ पर्यंत
शास्ती मध्ये ७५% सवलत.

पनवेल महानगरपालिकच्या panvelmc.org या संकेतस्थळावर जाऊन नागरीक आता मालमत्ता कराच्या विविध सेवाकरीता "पीएमसी कर मित्र" या प्रणालीचा वापर करू शकतात.
मालमत्ता कराचा भरणा, तक्रारी, अभिप्राय व सुचना "पीएमसी कर मित्र" या चॅटबॉट च्या माध्यमातून नोंदविता येतील.
नागरिकांनी आता मालमत्ता कराच्या विविध सेवाकरीता रांगेत उभे न राहता ऑनलाईन स्वरूपात "पीएमसी कर मित्र" या प्रणालीचा वापर करावा असे आवाहन आयुक्त तथा प्रशासक श्री. मंगेश चितळे यांनी केले आहे.

चालू वर्ष २०२५-२६ करिता ३१ ऑगस्ट २०२५ पर्यंत कराचा संपूर्ण भरणा करा, ५% सूट हमखास मिळवा.

E-Bill स्वीकारा, डिजिटल भरणा करा वेळ वाचवा, २% सूट घेऊन बचत वाढवा!

ऊर्जा बचत करा सौर शक्तीने, आणि करामध्ये घ्या २% सूट!

जल पुनःभरणाचा अवलंब करा, २% सूट सहज मिळवा!

घनकचरा शास्त्रोक्त पद्धतीने हाताळा, सवलतीचं दार उघडा आणि करात २% सूट मिळवा!

कचऱ्याची शिस्तबद्ध विल्हेवाट करा, मिळवा २% करामध्ये सवलत हमखास!

डिजिटल युगात स्मार्ट निर्णय
पारंपरिक रांगा सोडा,
PMC Tax App &
Panvel Connect App
वरून घरबसल्या कर भरा!

वेळ वाचवा, panvelmc.org वरून कर ऑनलाईन भरा आणि मालमत्ता करामध्ये सवलती मिळावा.

**मंगेश चितळे**
आयुक्त तथा प्रशासक,
**पनवेल महानगरपालिका**
स्वामी नित्यानंद रोड, गोखले हॉल जवळ पनवेल - 410206

संस्थापक-नाट्याचार्य कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर

संपादकीय

नवा काळ

।। न मे भक्त प्रणश्यति ।।

# ज्ञानेश्वर माऊली ईश्वरकृपेची सावली।

मग विश्वरूप व्यापुनि भोवती।
ते दिव्य योगतेज प्रकटले होते।
तेचि सामावले मागुते। कृष्णरूपी तिये।

ज्ञानेश्वर माऊलींनी या संपूर्ण विश्वाचा पसारा हा परमेश्वराच्या अलौकिक योगाचे तेज असल्याचा निर्वाळा यातून दिलेला आहे आणि म्हणूनच आज त्यांच्या संजीवन समाधीचे व्यापकत्व हेसुद्धा किती वैश्विक आहे. याचीदखील प्रचिती येते. माऊलींचा आज जन्मदिवस सध्या त्यांच्या संजीवन समाधीचे साडेसातशेवे वर्ष सुरू आहे. आपल्या पसायदानामधून त्यांनी केलेली विश्वमांगल्याची मागणी हीसुद्धा प्रत्येकाला विश्वरूप होण्यासाठी केलेली विनवणी ठरते. खळांची व्यंकटी सांडो, हे तर त्यांचे मागणे आहेच. परंतु स्वधर्म रति वाढो आणि जो जे वांछिल तो ते लाहो। ही त्यांची पसायदानातली विनवणीसुद्धा स्वतःमधल्या विश्वरूपाचे दर्शन घडवते. ज्ञानेश्वरी, अमृतानुभव, चांगदेव पासष्टी, या सगळ्याच त्यांच्या वाङमयीन मूर्ती म्हणजे प्रत्येकामध्ये कृष्णतत्त्व पाहायला सांगणाऱ्या ठरतात. एवढेच नव्हे तर त्यांचा हरिपाठ हा प्रत्येकालाच जीवनाचा परिपाठ शिकवून जातात. खरे तर कृष्णजन्माष्टमीच्याच दिवशी त्यांचा जन्म व्हावा यामध्येच कितीतरी मोठा ईश्वरी संकेत दडलेला पाहायला मिळतो. आज साडेसातशे वर्षानंतरही माऊली किंवा त्यांची ज्ञानेश्वरी मराठी माणसाच्या मनावर अधिराज्य गाजवते आहे. त्यांनी संस्कृत गीतेला प्राकृतात म्हणजे मराठीत आणून त्यातला दिव्य विचार व्यवहारात आणण्याचा मार्ग प्रशस्त केला. ज्ञानेश्वरीतल्या जवळपास नऊशे ओव्यांमध्ये निम्म्या ओव्या हा दृष्टांतपर आहेत. सृष्टीतल्या अनेक घडामोडींचा, प्रसंगांचा किंवा दैनंदिन व्यवहारातल्या अनेक गोष्टींची उदाहरणे देत देत त्यातील गीतेतला हा तत्त्वविचार कसा आचरणात आणता येऊ शकतो. याचे दर्शन घडवले आहे. त्यातून व्यक्त झालेला हा ज्ञानविचार मराठी मनाला इतका भावला ही आजही वारकरी संप्रदायामध्ये रोज त्याची पारायणे होतात. तेही जमले नाही तर आज महाराष्ट्राच्या कोट्यवधी घरांमध्ये हरिपाठ म्हटल्याशिवाय दिवसाच्या कामाला सुरूवात होत नाही किंवा रात्रीचे जेवणही घेतले जात नाही. लाभाविण प्रिती ज्याला म्हणतात त्याची ही मराठी मनाला आलेली साक्षात अनुभूती म्हणता येते. त्यातून व्यक्त झालेला जीवन जगण्याचा सोपा विचार व माऊलींचे ओसंडून वाहाणारे मातृप्रेम हीच प्रत्येकाला आकर्षित करणारी ठरतात.

**जीवनाचे सार**

माऊलींचा हरिपाठ तर हरिमुखे म्हणा, हरिमुखे म्हणा असे म्हणत पुण्याची गणना सहजपणे करायला लावतो. सामान्य माणूस असो किंवा चोवीस तास कामामध्ये व्यग्र असणारा कामसू असो या सर्वांनाच त्यांनी आपल्या रोजच्या चोवीस तासातून केवळ एक क्षण बाजूला काढायला सांगितला आहे. देवाचिये द्वारी, उभा क्षणभरी तेणे मुक्तीचारी साधियेल्या। ही हरिपाठातील केवळ ओवी नाही तर जीवन जगण्याचा अत्यंत सोपा उपाय आहे. कोणाही व्यक्तीने क्षणभर जरी नामस्मरण केले तरी ते त्याला मुक्तीच्या दारापर्यंत घेऊन जाते. रोज हरिपाठ म्हणणाऱ्याला भक्तीची गोडी इतक्या सहजपणे लागते की तो आपोआप ज्ञानेश्वरी वाचण्याच्या प्रेमात पडतो. त्याच्या नामस्मरणाच्या माळा आणि वेळाही वाढत जातात आणि यातून प्राप्त होणारे भक्तीविषयक ज्ञान ज्याचा जीवनाविषयीचा अंधार दूर करतात. पोट पाणी, पैसा परिश्रम या तर कोणालाच चुकलेल्या गोष्टी नाहीत. परंतु या सर्वांची प्राप्ती ही परमेश्वरासाठी आहे. अशी जेव्हा दृढ श्रद्धा निर्माण व्हायला लागते तेव्हा एकूणच आपण या विश्वाच्या पसाऱ्यामध्ये परमेश्वराच्या तेजाचेच अंश आहोत याचीही जाणीव होते. म्हणूनच माऊलींनी त्या योगतेजाला आपल्यामध्येच सामावले असल्याचा दाखला दिलेला आहे. हरिपाठात तर त्यांनी

नामापरते तत्त्व नाही रे अन्यथा। वाया आणिक पंथा जाशी झणी।
ज्ञानदेवा मौन जपमाळ अंतरी, धरोनी श्रीहरि जपे सदा।

नामस्मरणासारखे दुसरे कोणतेही तत्त्व नाही. मौन होऊन केली जाणारी श्रीहरिची नामसाधना जीवनाचे सार्थक सिद्ध करून जाते आणि ज्याने हा नामस्मरणाचा मार्ग अवलंबला नाही त्याने आपले आयुष्य वाया घालवले अशा स्पष्ट शब्दामध्ये माऊलींनी आपल्या सगळ्याच लेकरांची काळजी घेतल्याचे स्पष्टपणे दिसून येते. म्हणूनच ते माऊली या पदवीला सार्थ करतात.

**मराठी आणि ब्रह्मविद्या**

अमृताते पैजा जिंके हे त्यांचे मराठीविषयीचे उद्गार म्हणजे त्यात दडलेला मराठीपणाचा व्यापक व्यवहारही आहे. आपल्या मातृभाषेविषयी त्यांनी व्यक्त केलेला हा अभिमान मराठीचे वैश्विक कौतुक सांगणारा ठरतो. कारण माझ्या मराठीचे बोलू कौतुके परि अमृतातेही पैजा जिंके। ऐसी अक्षरे मिळविन। त्यांचे असे म्हणणे आहे की त्यांनी मराठीतून व्यक्त केलेले वर्णन थेट अमृताशीच स्पर्धा करणारे आहे. हे वर्णन चांगले की अमृत चांगले असा तुमच्यापुढे प्रश्न पडू शकतो. माऊलींना ही आपली भाषा ब्रह्मविद्येचा सुकाळ करणारी वाटली होती. म्हणजे त्यातून संपूर्ण ब्रह्मांडाचे ज्ञान प्राप्त करण्याची शक्ती सामावलेली आहे. इतकी व्यापकता आपल्या या मराठीमध्ये असल्याचे माऊली नकळतपणे सांगून जातात. अशा परिस्थितीत त्यांचे सगळेच साहित्य हे अमृतपान करणारे ठरते आणि त्याची धन्यता शब्दात व्यक्त होऊ शकत नाही. महाराष्ट्राच्या भूमीत माऊलींचा जन्म व्हावा आणि तिथेच त्यांनी संजीवन समाधी घ्यावी हा अध्यात्म शास्त्रातला सर्वात दिव्य असा सुखाचा सोहळा ठरतो. मराठीपणाचा अभिमान मिरवत असताना ज्ञानेश्वरांचे स्मरण किती अनिवार्य आहे हे लक्षात येते. म्हणूनच नामदेवांनी एक तरी ओवी अनुभवावी अशा प्रकारचे आवाहन करून ज्ञानेश्वरीच्या दिव्यतेचा गौरव केलेला आहे. दुर्दैवाचा भाग एवढाच आहे की, या सगळ्याच संतांच्या ईश्वरस्पर्ष लाभलेल्या साहित्याकडे दुर्लक्ष होत राहाते. पोटापाण्याच्या भ्रांतभ्रमणामध्ये जीवनाच्या उद्देशाचा ठावठिकाणा राहात नाही. म्हणूनच या सगळ्या संतांनी रोजच्या नामस्मरणातून आपल्या आत्मतत्त्वाशीच सोयरिक करण्याचा सोपा मार्ग सांगून ठेवला आहे.

**सुविचार**

विलास कोळेकर
खंडाळा, रत्नागिरी. मोबा.९४२२४२०६११

**वागणूक हा एक असा आरसा आहे की, ज्यात प्रत्येक जण स्वतःची प्रतिमा इतरांना दर्शवत असतो.**

**पंचांग**

**शनिवार, १६ ऑगस्ट २०२५**
**शक १९४७ विश्वावसुनामसंवत्सर**
**श्रावण कृष्ण अष्टमी**
नक्षत्र : कृतिका

रवी उदय- ०६-२१
रवी अस्त- १९-०४

-: जन्मराशी :-
००-०१ ते ११-४३ मेष
११-४४ ते २४-०० वृषभ

गोपाळकाला; कालाष्टमी; अश्वत्थ मारूती पूजन; श्रीकृष्ण जयंत्योत्सव (वैष्णव);
सूर्य-मघा-सिंहेला उत्तररात्री १.५२, वाहन-बेडूक; संत ज्ञानेश्वर महाराज जयंती

मुद्रक, प्रकाशक **सौ. जयश्री रमाकांत खाडिलकर-पांडे** यांनी हे दैनिक नवाकाळ ऑफीस आणि नवाकाळ प्रेस करिता १) दांगट मीडिया प्रा.लि., पत्ता: प्लॉट नं. २२, दिघा एमआयडीसी, टीटीसी इंडस्ट्रीयल एरीया, विष्णू नगर, दिघा, नवी मुंबई -४००७०८. २) एलिगंट ऑफसेट प्रिंटर्स प्रा.लि., पत्ता: प्लॉट नं.एफ ७-१ आणि एफ ७-२/२, एमआयडीसी, शिरोली इंडस्ट्रीयल एरीया, शिरोली गाव, ता.हातकणंगले, जिल्हा कोल्हापूर - ४१६१२२ येथे छापून घेतले व नवाकाळ बिल्डिंग, १३ नवाकाळ पथ, खाडीलकर रोड, गिरगांव, मुंबई -४००००४ येथे प्रसिद्ध केले.
संपादक : **रोहित रमाकांत पांडे** • कार्यकारी संपादक: **समीर करंबे** (*पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी कार्यकारी संपादक यांच्यावर आहे.)

संपर्क : संपादक विभाग: ८६५२२०१४४०,
जाहिरात विभाग : ८१०८११६४२३, ८१०८११६४२९,
छोट्या जाहिराती: ८४२२८१७४४५. वितरण विभाग : ९५९४९३६४४१
ई-मेल: navakal.1923@gmail.com
'नवाकाळ ऑफिस व नवाकाळ प्रेस'चे प्रकाशन दैनिक
'नवाकाळ' आर.एन.आय.क्र.१८१४/५७
स्थापना ७ मार्च १९२३/ फाल्गुन वद्य ५ शके १८४४

Printed and Published by **Jayshree Ramakant Khadilkar-Pande** On behalf of Navakal Office And Navakal Press. Printed at 1) Dangat Media Pvt. Ltd., Address : Plot No.22, Digha M.I.D.C., TTC Industrial Area, Vishnu Nagar, Digha, Navi Mumbai - 400 708. . 2) Elegant Offset Pvt. Ltd., Address : Plot No.F7-1 & F7-2/2, M.I.D.C., Shiroli Industrial Area, Village Shiroli, Tal. Hatkanagle, Dist Kolhapur-416122. Published at Navakal Building, 13 Navakal Path, Khadilkar Road, Girgaum, Mumbai - 400 004.
Editor - **Rohit Ramakant Pande** • Executive Editor - **Sameer Karambe** (*As per P.R.B. law Executive Editor will be responsible for all the content in Daily Navakal)

## पाककृती



### टोमॅटो पराठा

★ **साहित्य** - गव्हाचे पीठ - दोन कप, टोमॅटो -दोन , कोथिंबीर , हिरवी मिरची- एक, तिखट - अर्धा टीस्पून, हळद- अर्धा टीस्पून, ओवा - अर्धा टीस्पून, जिरे - अर्धा टीस्पून
मीठ, तेल किंवा तूप, आल्याच्या किस, पाणी

★ **कृती** - सर्वात आधी एका भांड्यात गव्हाचे पीठ घ्या. त्यात किसलेले टोमॅटो, हिरवी मिरची तुकडे, बारीक चिरलेली कोथिंबीर, किसलेले आले, हळद, तिखट, ओवा, जिरे आणि मीठ घाला. सर्व साहित्य चांगले मिसळा. आता टोमॅटोमध्ये आधीच ओलावा असतो, म्हणून गरजेनुसार थोडे पाणी घाला आणि मऊ पीठ मळून घ्या. पीठ काही मिनिटे झाकून ठेवा. आता पीठाचे मध्यम आकाराचे गोळे बनवा. पीठ गोल आकारात किंवा रोलिंग पिन वापरून तुमच्या आवडीचे लाटून घ्या. आता तवा गरम करा आणि त्यावर पराठा ठेवा. दोन्ही बाजूंना थोडे तेल किंवा तूप लावा आणि दोन्ही बाजू सोनेरी आणि कुरकुरीत होईपर्यंत भाजून घ्या. तयार पराठा प्लेटमध्ये काढा व हिरव्या चटणीसोबत सर्व्ह करा.



# आशियाई चॅम्पियन्स लीगचे वेळापत्रक जाहीर रोनाल्डो भारतात खेळण्यासाठी येणार?

**आशियाई चॅम्पियन्स लीग-२ चे वेळापत्रक जाहीर झाले आहे. यामध्ये गोवा एफसीला अल निसार, अल ज्वारा एफसी आणि एफसी इस्तिकोलसह ग्रुप डी मध्ये स्थान देण्यात आले आहे. या संघांना होम आणि अवे सामने खेळावे लागणार आहेत. गोवा एफसीने एक्स पोस्टमध्ये ही माहिती शेअर केली. पोर्तुगालचा स्टार फुटबॉलपटू क्रिस्टियानो रोनाल्डो भारतात येऊ शकतो. तो सौदी अरेबियाच्या क्लब अल निसारकडून गोवा एफसी विरुद्ध सामना खेळू शकतो.**



■ दुबई

क्रिस्टियानो रोनाल्डोच्या अल निसारसोबतच्या करारात एक नियम आहे ज्यामध्ये असे म्हटले आहे की, तो स्पर्धेतील अवे सामने वगळू शकतो. रोनाल्डोने गेल्या वर्षी फक्त एक अवे सामना खेळला. रोनाल्डो व्यतिरिक्त जोआओ फेलिक्स, सॅडिओ माने आणि इनिगो मार्टिनेझसारखे स्टार खेळाडू एफसी गोवा विरुद्धच्या गट सामन्यात खेळू शकतात. रोनाल्डो अल-अव्वल पार्क (सौदी अरेबिया) येथे होणाऱ्या एफसी गोवा विरुद्धच्या सामन्यात खेळण्याची शक्यता आहे. तथापि, या नियमाची पुष्टी झालेली नाही. मोहन बागानला ग्रुप क मध्ये स्थान, स्पर्धा १६ सप्टेंबरपासून या स्पर्धेत सहभागी होणाऱ्या आणखी एका भारतीय क्लब मोहन बागानला गट क मध्ये स्थान देण्यात आले आहे. त्यांचा सामना इराणच्या फुलद मोबारकेह सेपहान एससी, जॉर्डनच्या अल हुसेन आणि तुर्कमेनिस्तानच्या अहल एफसीशी होईल. आशियाई चॅम्पियन्स लीग-२ १६ सप्टेंबरपासून सुरू होत आहे. गट टप्प्यातील सामने २४ डिसेंबरपर्यंत खेळवले जातील. त्याचा अंतिम सामना ६ मे पासून खेळला जाईल. ९०० गोल करणारा जगातील पहिला खेळाडू गेल्या वर्षी ५ सप्टेंबर रोजी क्रोएशियाविरुद्धच्या सामन्यात रोनाल्डोने त्याच्या कारकिर्दीतील ९०० वा गोल केला. असा पराक्रम करणारा तो जगातील पहिला खेळाडू आहे. हा टप्पा गाठल्यानंतर रोनाल्डोने त्याच्या फुटबॉल प्रवासाची एक क्लिप सोशल मीडियावर शेअर केली. त्याने असेही म्हटले की, त्याचे हे स्वप्न खूप दिवसांपासून होते, जे पूर्ण झाले आहे. अजून काही स्वप्ने पूर्ण करायची आहेत.

## विश्वविजेता डी. गुकेशची सहाव्या स्थानावर घसरण

■ सेंट लुईस



ग्रँड चेस टूरचा भाग असलेल्या सेंट लुईस रॅपिड आणि ब्लिट्झ स्पर्धेच्या पहिल्या दिवशी एका विजय आणि ४ बरोबरीनंतर भारताचा विश्वविजेता डी. गुकेश सहाव्या स्थानावर घसरला. गुकेशला दुसऱ्या सत्रात चांगली कामगिरी करावी लागेल. कारण त्याला पुनरागमन करण्यासाठी फक्त नऊ ब्लिट्झ गेम शिल्लक आहेत. अमेरिकेचा लेव्हॉन आरोनियन एकूण १९ गुणांसह अव्वल स्थानावर आहे, तर फॅबियानो कारुआना त्यांच्या २ गुणांनी मागे आहे. फ्रान्सचा मॅक्सिम वाचियर-लाग्रेव्ह १६.५ गुणांसह तिसऱ्या स्थानावर आहे. उझबेकिस्तानचा ग्रँडमास्टर नोदिरबेक अब्दुसत्तोरोव्ह अमेरिकेचा वेस्ली सो यांच्यासह संयुक्तपणे चौथ्या स्थानावर आहे. गुकेश आणि व्हिएतनामचा लिम ले क्वांग प्रत्येकी १३ गुणांसह सहाव्या स्थानावर आहेत.

## आंतरराज्य महिला क्रिकेट स्पर्धा २३ ऑगस्टपासून सुरू

■ रोहतक

भारतीय क्रिकेट नियामक मंडळाच्या वतीने २३ ऑगस्टपासून आंतरराज्य महिला क्रिकेट स्पर्धेसाठी निवड प्रक्रिया सुरू होईल. यामध्ये हरियाणाच्या १५ वर्षांखालील, १९ वर्षांखालील, २३ वर्षांखालील आणि वरिष्ठ महिला संघांची निवड केली जाईल. हरियाणा क्रिकेट असोसिएशनचे सीईओ विक्रांत सिंग यांनी माहिती दिली की, १९ वर्षांखालील गट (मुली), २३ वर्षांखालील गट (मुली) आणि वरिष्ठ गट (मुली) संघांची निवड २३ ऑगस्ट रोजी लाहली येथील चौधरी बन्सीलाल क्रिकेट स्टेडियममध्ये होईल आणि १५ वर्षांखालील गट (मुली) संघाची निवड २४ ऑगस्ट रोजी होईल.त्यांनी सांगितले की, १५ वर्षांखालील गटातील (मुली) संघासाठी खेळाडूचा जन्म १ सप्टेंबर २०१० ते ३१ ऑगस्ट २०१३ दरम्यान असावा. १९ वर्षांखालील गटातील (मुली) संघासाठी खेळाडूचा जन्म १ सप्टेंबर २००६ किंवा त्यानंतर झालेला असावा. २३ वर्षांखालील गट (मुली) संघासाठी खेळाडूचा जन्म १ सप्टेंबर २००२ रोजी किंवा त्यानंतर झालेला असावा.

## भारत-अ महिला संघाचा ऑस्ट्रेलियावर विजय

■ ब्रिस्बेन



ब्रिस्बेनच्या इयान हिली ओव्हल स्टेडियमवर झालेल्या दुसऱ्या एकदिवसीय सामन्यात ऑस्ट्रेलियाविरुद्ध भारत-अ महिला संघाने २ विकेट राखून विजय मिळवला. या विजयासह भारताने ३ सामन्यांच्या मालिकेत २-० अशी आघाडी घेतली. ऑस्ट्रेलियाने ५० षटकांत ९ गडी गमावून २६५ धावा केल्या. प्रत्युत्तरात भारताने १ चेंडू शिल्लक असताना ८ गडी गमावून लक्ष्य गाठले.

ऑस्ट्रेलियाकडून एलिसा हिलीने सर्वाधिक ९१ धावा केल्या. किम गार्थने ४१ धावांची नाबाद खेळी केली. एला हेवर्डने २८ धावा आणि राहेल ट्रेनमनने २४ धावांचे योगदान दिले. टीम इंडियाकडून मिन्नू मणी सर्वात यशस्वी गोलंदाज ठरली. तिने ३ बळी घेतले. सायमा ठाकोरने २ बळी घेतले. तितस साधू, तनुजा कंवर, प्रेमा रावत आणि राधा यादव यांनी १-१ बळी घेतले. भारताकडून यास्तिका भाटियाने ७१ चेंडूत ६६, राधा यादवने ७८ चेंडूत ६० आणि तनुजा कंवरने ५७ चेंडूत ५० धावा केल्या. प्रेमा रावतने नाबाद ३२ धावा केल्या. ऑस्ट्रेलियाकडून जॉर्जिया प्रेस्टविज, एमी एडगर आणि एला हेवर्डने २-२ विकेट घेतल्या. किम गार्थला एक विकेट मिळाली. यापूर्वी ऑस्ट्रेलिया-अ संघाने टी-२० मालिका ३-० ने जिंकली होती. संघाने पहिला सामना १३ धावांनी, दुसरा सामना ११४ धावांनी आणि तिसरा सामना ४ धावांनी जिंकला. एकदिवसीय मालिकेनंतर २१ ऑगस्टपासून दोन्ही संघांमध्ये एकच अनधिकृत कसोटी सामनाही होईल.

## बीओबी शालेय बुध्दिबळ स्पर्धेत मानस, दीप, स्वरूपची विजयी सलामी

■ मुंबई

आयडियल स्पोर्ट्स अकॅडमीतर्फे बँक ऑफ बडोदा पुरस्कृत स्वातंत्र्य दिनी सुरु झालेल्या बीओबी ट्रॉफी शालेय बुध्दिबळ स्पर्धेत फिडे गुणांकित सबज्युनियर बुध्दिबळपटू मानस हाथी, दीप फुणगे, स्वरूप बेलेमकर, श्लोक पवार, मैत्रेयी बेरा आदींनी सलामीचे सामने जिंकले. १३ वर्षाखालील वयोगटात प्रथम मानांकित मानस हाथीने आक्रमक चाली रचत आयुष्मान चक्रवर्तीच्या राजाला १९ व्या मिनिटाला नमविले. माजी नगरसेवक सुनील अहिर, राष्ट्रीय मिल मजदूर संघाचे सरचिटणीस गोविंदराव मोहिते, फिडे बुध्दिबळ प्रशिक्षक राजाबाबू गजेंगी, शिवछत्रपती पुरस्कार विजेते लीलाधर चव्हाण आदी मंडळींच्या प्रमुख उपस्थितीत स्पर्धेचे उद्घाटन झाले. आरएमएमएस व मुंबई शहर जिल्हा बुध्दिबळ संघटना सहकार्यीत १३ वर्षाखालील बुध्दिबळ स्पर्धेत दुसऱ्या पटावर फिडे गुणांकित द्वितीय मानांकित दिवीत मोदीला दीप फुणगेने चकविले. वजीर व हत्तीच्या सहाय्याने दीप फुणगेने प्रतिस्पर्ध्याच्या राजाला २४ व्या मिनिटाला शह दिला आणि सनसनाटी विजयाची नोंद केली.

## महाराष्ट्राचे माजी क्रिकेटपटू निकोलस साल्दान्हा यांचे निधन

■ पुणे



महाराष्ट्र क्रिकेट संघाचे माजी क्रिकेटपटू निकोलस साल्दान्हा यांचे पुण्यात वयाच्या ८३ व्या वर्षी निधन झाले. देशांतर्गत प्रथम श्रेणी क्रिकेटमध्ये महाराष्ट्रासाठी निकोलस साल्दान्हा यांनी उल्लेखनीय कामगिरी केली होती.

निकोलस हे उजव्या हाताचे फलंदाज होते. फलंदाजीसह ते फिरकी गोलंदाज देखील होते. एकूण कारकिर्दीमध्ये त्यांनी ५७ प्रथम श्रेणी सामने खेळले. या सामन्यांमध्ये ३० च्या सरासरीने २,०६६ धावा केल्या आणि २२.४८ च्या प्रभावी सरासरीने १३८ बळी घेतले होते. महाराष्ट्र क्रिकेट असोसिएशन म्हणजेच एमसीएने त्यांना श्रद्धांजली वाहिली. एमसीएने त्यांना आमच्या सर्वोत्तम खेळाडूंपैकी एक म्हणून संबोधले.

## आकाशदीपला दुखापत! दुलीप ट्रॉफी स्पर्धेतून बाहेर



■ मुंबई

भारताचा वेगवान गोलंदाज आकाशदीपला दुखापत झाली. त्यामुळे आकाशला दुलीप ट्रॉफी स्पर्धेतून बाहेर व्हावे लागले आहे. त्याला इंग्लंड दौऱ्यातील पाचव्या व अंतिम कसोटीत गोलंदाजी करताना त्रास जाणवत होता.

आकाशदीप दुलीप ट्रॉफी स्पर्धेत इस्ट झोनसाठी खेळणार होता. इस्ट झोन संघाच्या नेतृत्वाची धुरा ईशान किशन याच्याकडे आहे. इंग्लंड दौऱ्यात जसप्रीत बुमराह यालाही दुखापत झाली होती. त्यानंतर आता आकाश दुखापतीच्या जाळ्यात अडकला आहे. भारतासाठी आशिया कप स्पर्धेच्या पार्श्वभूमीवर दोन्ही गोलंदाजांना दुखापत होणे चांगली चिन्हे नाहीत.आशिया कप स्पर्धेसाठी आकाशदीपच्या नावाची चर्चा नव्हती. मात्र दुखापतीमुळे आकाश या शर्यतीतून पूर्णपणे बाहेर झाला आहे. त्यामुळे आकाशला फिटनेसवर काम करावे लागणार आहे. आकाश वेळेत फिट झाल्यास त्याला वेस्ट इंडिज विरूद्धच्या कसोटी मालिकेत संधी मिळू शकते. भारतीय संघ आशिया कप स्पर्धेनंतर मायदेशात वेस्ट इंडिज विरुद्ध कसोटी मालिका खेळणार आहे. या मालिकेत उभयसंघात २ ते १४ ऑक्टोबर दरम्यान २ सामने खेळवण्यात येणार आहेत.


हुकमिल लेनचा राजा


कृष्णनगरचा राजा, परळ


काळाचौकीचा राजा


मालाडचा महाराजा

# जिल्ह्याच्या सर्वांगीण विकासाचा संकल्प करू

**प्रकाश आबिटकर यांचे आवाहन**

■ कोल्हापूर

**जिल्ह्यातील** लोकप्रतिनिधी, शासकीय यंत्रणा आणि नागरिकांच्या सहकार्यातून जिल्ह्याची कृषी, उद्योग, आरोग्य, कला, क्रीडा, पर्यटन, माहिती तंत्रज्ञान इ. सर्वच क्षेत्रात प्रगती साधली जात असून जिल्ह्याच्या सर्वांगीण विकासासाठी आवश्यक ते सर्व सहकार्य करण्याचा संकल्प सर्वजण मिळून करुया, असे आवाहन सार्वजनिक आरोग्यमंत्री तथा कोल्हापूर जिल्ह्याचे पालकमंत्री प्रकाश आबिटकर यांनी केले. भारताच्या ७९ व्या स्वातंत्र्यदिनानिमित्त पालकमंत्री प्रकाश आबिटकर यांच्या हस्ते कोल्हापूर जिल्हाधिकारी कार्यालयाच्या प्रांगणात मुख्य शासकीय ध्वजारोहण झाले. यावेळी जैन आर्थिक विकास महामंडळाचे अध्यक्ष ललित गांधी, खासदार शाहू महाराज छत्रपती, जिल्हाधिकारी अमोल येडगे, कोल्हापूर महानगरपालिका आयुक्त के. मंजुलक्ष्मी, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी कार्तिकेयन एस., जिल्हा पोलीस अधीक्षक योगेशकुमार गुप्ता, अपर जिल्हाधिकारी संजय शिंदे, निवासी उपजिल्हाधिकारी संजय तेली यांच्यासह स्वातंत्र्यसैनिक, माजी सैनिक व त्यांचे कुटुंबीय, ज्येष्ठ नागरिक, अधिकारी-कर्मचारी, विद्यार्थी-पालक, नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# विहिरीवरील दहीहंडीची ३३ वर्षांची अनोखी परंपरा

■ रायगड



**रायगड** जिल्ह्यातील कुर्डूस गावात विहिरीच्या कठड्यावर थर रचून साजरी होणारी दहीहंडी यंदा ३३ व्या वर्षात पदार्पण करत आहे. १९९२ साली पिंगळे, पाटील, शेरमकर, थळे व केणी कुटुंबातील तरुणांनी ही अनोखी परंपरा सुरू केली. विशेष म्हणजे, आजवर या थरारात एकाही गोविंदाला इजा झालेली नाही.

सुरुवातीला सिताफळाच्या झाडाच्या आधाराने थर रचले जात होते. मात्र नंतर विहिरीच्या कठड्यावरच थर चढवण्यास सुरुवात झाली. गोविंदा हंडीला हात लावतो, तेव्हा ती फुटली असे समजले जाते. हंडी खाली उतरवून ती विहिरीत फोडली जाते. त्यानंतर सर्व गोविंदा विहिरीत उडी मारून जल्लोष करतात. मुंबई, पुणे आणि राज्यभरातून गोविंदा पथके या अनोख्या दहीहंडीचा अनुभव घेण्यासाठी कुर्डूसमध्ये येतात. मागील वर्षी आकाश पिंगळेने सलग पाचव्यांदा हंडी फोडून विक्रम केला. यावर्षी उद्या दुपारी १२ वाजताच्या सुमारास हा थरार पार पडणार आहे. ही परंपरा आता धाडस, एकता आणि गावाचा अभिमान झाली असल्याचे आयोजकांनी सांगितले.

# महावितरणमध्ये स्वातंत्र्यदिन साजरा

■ कल्याण



महावितरणच्या कल्याण कार्यालयात ७९ वा स्वातंत्र्यदिन साजरा करण्यात आला. गोदरेज हिल येथील कोकण प्रादेशिक कार्यालयात सह व्यवस्थापकीय संचालक दिलीप जगदाळे यांच्या हस्ते तर कल्याण परिमंडळ कार्यालयाच्या तेजश्री इमारतीत मुख्य अभियंता चंद्रमणी मिश्रा यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. या निमित्ताने महावितरण कंपनीतून सेवानिवृत्त झालेल्या अधिकारी आणि कर्मचाऱ्यांचा सह व्यवस्थापकीय संचालक दिलीप जगदाळे यांच्या हस्ते शाल श्रीफळ देऊन सत्कार करण्यात आला. यावेळी सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांनी सेवा काळातील अनुभव कथन करून जुन्या आठवणींना उजाळा दिला नाही.यावेळी अधीक्षक अभियंता महेश अंचितमाने, विजय फुंदे, नितीन काळे, कैलास दुधबर्वे, मोहन काळोखे, उप महाव्यवस्थापक (माहिती तंत्रज्ञान) योगेश खैरनार, (मानव संसाधन) सुशिल पावसकर आदी मान्यवर उपस्थित होते.

# माजी क्रिकेटपटू युवराज सिंहच्या बहिणीची पॅडल टीममध्ये निवड

■ नवी दिल्ली

**भारताची** पॅडल टीम ऑगस्ट २०२५ मध्ये मलेशियातील क्वालालंपूर येथे होणाऱ्या आशिया पॅसिफिक पॅडल कप स्पर्धेत सहभागी होणार आहे. यात माजी भारतीय क्रिकेटपटू युवराज सिंहची सावत्र बहीण अमरज्योत कौर उर्फ एमी बुंडेल हिची निवड झाली आहे. अमरज्योतने या निवडीला आपल्या पॅडल कारकिर्दीतील सर्वात मोठा क्षण म्हटले आहे. अमरज्योत ही माजी क्रिकेटपटू योगराज सिंग आणि पंजाबी अभिनेत्री नीना बुंडेल यांची कन्या असून, ती चंदीगडमध्ये



राहते.आशिया पॅसिफिक पॅडल कप ही आशिया-पॅसिफिक प्रदेशातील सर्वात मोठी पॅडल स्पर्धा आहे, ज्यात अनेक आघाडीचे संघ सहभागी होतात.

# राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन यांच्या हस्ते ध्वजारोहण

■ पुणे

**भारताच्या** ७९ व्या स्वातंत्र्यदिनानिमित्त राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन यांच्या हस्ते विधानभवन येथे मुख्य शासकीय ध्वजारोहण करण्यात आले. ध्वजारोहणानंतर राज्यपाल राधाकृष्णन यांनी स्वातंत्र्यसैनिक, माजी सैनिक, लोकप्रतिनिधी, नागरिक तसेच अधिकारी-कर्मचाऱ्यांची भेट घेऊन त्यांना स्वातंत्र्यदिनाच्या शुभेच्छा दिल्या.यावेळी नगर विकास राज्यमंत्री माधुरी मिसाळ, आमदार बापूसाहेब पठारे, विभागीय आयुक्त डॉ. चंद्रकांत पुलकुंडवार, पुणे पोलीस आयुक्त अमितेश कुमार, पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्त विनयकुमार चौबे, कोल्हापूर परिक्षेत्राचे विशेष पोलीस महानिरीक्षक सुनील फुलारी, पुणे महानगरपालिका आयुक्त नवल किशोर राम, पिंपरी चिंचवड महापालिका आयुक्त शेखर सिंह, जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी गजानन पाटील, पोलीस अधीक्षक संदीप सिंग गिल यांच्यासह सैन्यदलातील अधिकारी, विविध विभागांचे वरिष्ठ अधिकारी, स्वातंत्र्यसैनिक, माजी सैनिक, लोकप्रतिनिधी, अधिकारी, कर्मचारी, नागरिक, शालेय विद्यार्थी उपस्थित होते.

**शुद्धीपत्रक**

दिनांक २६/०७/२०२५ रोजी मे. युनीकेम लेबोरेटरीज् लिमिटेड यांनी दिलेल्या नवाकाळ व नवशक्ती वर्तमानपत्रात जाहिरातीच्या अनुषंगाने अनवधानाने १३५५६.९८ चौ. मी. लिहिले गेले आहे ते आता १३७८५.२३ चौ. मी. असे वाचावे.

दिनांक : १६/०८/२०२५

मे. युनीकेम लेबोरेटरीज् लिमिटेड
सचिव




स्वातंत्र्य दिनानिमित्त इमारतीमधील १० वी ,१२ वी विद्यार्थ्यांचा गुणगौरव समारंभ श्री सिध्दी सागर संस्था व श्री साई सेवेकरी न्यास (वरळी) यांच्या वतीने करण्यात आला. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून जेष्ठ समाजसेवक हरिनाथ तिवारी व बालगोविंद तिवारी उपस्थित होते. हा कार्यक्रमात संस्थेचे अध्यक्ष श्राजेंद्र अ.रवानविलकर यांनी उपस्थित मान्यवर पाहुण्यांचा सत्कार केला.

# हुमायूनच्या कबरीचा भाग कोसळला ! सात जण ठार

■ नवी दिल्ली

**राजधानी** दिल्लीच्या हजरत निजामुद्दीन परिसरातील हुमायूनच्या कबरीचा एका घुमटाचा भाग सायंकाळी साडेचार वाजताच्या सुमारास कोसळला. या दुर्घटनेत बचावपथकाने ७ जण ठार झाले. मृतामध्ये ७९ वर्षांचा एक आणि ३५ वर्षांचा पुरुषाचा समावेश आहे. घुमटाचा भाग कोसळण्याचे कारण अद्यापी स्पष्ट झालेले नाही. या दुर्घटनेत ११ जखमी झाले असून सुरक्षित बाहेर काढून उपचारासाठी जवळच्या रुग्णालयात दाखल केले. पोलिसांनी सांगितले की, हुमायूनची कबर १६व्या शतकातील एक ऐतिहासिक स्मारक असल्याने ते पर्यटकांच्या आकर्षणाचे केंद्र आहे. दुपारी कबरीचा एक घुमट कोसळल्याने दुर्घटना झाली. जखमींना बाहेर काढून रुग्णालयात दाखल केले. या घटनेनंतर घटनास्थळाचा परिसर सुरक्षा कारणास्तव तात्पुरता बंद करण्यात आला.

**महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ**
(महाराष्ट्र शासन अंगिकृत)
**मुदतवाढ सूचना क्र. २**
**ई-निविदा सूचना क्र. ३०/२०२५-२०२६ (मुंबई) करीता**

दिनांक २८/०७/२०२५ रोजी दैनिक नवाकाळ, मुंबई, दैनिक मिड डे, मुंबई, दैनिक मुंबई तरूणभारत, मुंबई, या वृत्तपत्रामध्ये प्रसिद्ध झालेल्या वरील ई निविदा सूचनेतील खालील कामांकरीता ई निविदा शासनाच्या https://mahatenders.gov.in या संकेतस्थळावर उपलब्धतेबाबत मुदतवाढ सूचना देण्यात येत आहे.

| अ. क्र. | कामाचे नाव | अंदाजित रक्कम |
|---|---|---|
| १. | पाताळगंगा पाणीपुरवठा योजनेची देखभाल व दुरुस्ती..७०० मि.मी. व्यासाच्या मृदु पोलादी जलवाहिनीची व सार्वजनिक बांधकाम विभागाच्या गेस्ट हाऊस (साखळी क्र. २४.००० कि.मी.) ते नावडे (साखळी क्र. ३१.००० किमी) दरम्यानच्या ६७५ मि.मी. व्यासाच्या सीआय जलवाहिनीची दैनंदिन देखभाल व दुरुस्ती करणे. | ₹ १४,६९,८२०.०० |

उपरोक्त कामांकरीता निविदा प्रपत्र दिनांक २८/०८/२०२५ पर्यंत शासनाच्या https://mahatenders.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध असतील.

ज्या निविदाधारकांनी यापूर्वी आपली निविदा भरली असेल अथवा अपलोड केली असेल, त्यांनी निविदेमध्ये बदल करुन किंवा बदल न करता सदर निविदा पुन्हा भरणे आवश्यक आहे, याची कृपया नोंद घ्यावी, अशा कंत्राटदारांनी शुद्धिपत्रकानंतर जर निविदा पुन्हा भरली नाही अथवा अपलोड केली नाही तर त्यांचा देकार सदर स्पर्धात्मक निविदेतून आपोआप बाद होईल.

सदर निविदा सूचनेत इतर कोणताही बदल करण्यात आलेला नाही.

# पुण्यातील आशा हॉटेलला आग ! एक कर्मचारी जखमी

■ पुणे

**पुणे** शहरातील दत्तवाडी परिसरातील प्रसिद्ध आशा हॉटेलला आज सकाळी आठ वाजताच्या सुमारास भीषण आग लागली. या आगीत हॉटेलमधील एक कर्मचारी गंभीर जखमी झाला. त्याच्यावर रुग्णालयात उपचार सुरू आहेत. या घटनेची माहिती मिळताच अग्निशमन दलाच्या तीन गाड्या तातडीने घटनास्थळी दाखल झाल्या. त्यांनी आगीवर नियंत्रण मिळवले. या आगीमुळे परिसरात भीतीचे वातावरण पसरले होते. सुदैवाने या घटनेत कोणतीही जीवितहानी झाली नाही. मात्र हॉटेलचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले.

# साताऱ्याजवळ २.९ रिश्टरचा भूकंप

■ सातारा

सातारा जिल्ह्यात कोयना धरणापासून सुमारे ४० किमी अंतरावर २.९ रिश्टर स्केलचा भूकंप जाणवला. भूकंपाचे केंद्र वारणा धरणाजवळ असल्याचे सांगितले जात आहे. भूकंपामुळे सध्या कोणतीही हानी झाल्याची माहिती नाही. स्थानिक नागरिकांना हलके हादरे जाणवले. भूकंपविज्ञान विभागाने यावर लक्ष ठेवले आहे.

# देशातील पहिला अर्बन एलिव्हेटेड एक्स्प्रेस-वे १७ ऑगस्टला खुला

■ गुरुग्राम

**पंतप्रधानांच्या हस्ते लोकार्पण**

**देशातील** पहिलाच अर्बन एलिव्हेटेड द्वारका एक्स्प्रेस-वे आणि अर्बन एक्स्टेन्शन रोड-२ चे १७ ऑगस्ट रोजी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते लोकार्पण होणार आहे. दिल्लीतील रोहिणी येथील हेलिपॅडजवळ या महत्त्वाकांक्षी प्रकल्पाचा उद्घाटन समारंभ पार पडणार आहे.

सुमारे ९ हजार कोटी रुपये खर्चून उभारलेला ८-लेनचा २९ किमी लांबीचा द्वारका एक्स्प्रेस-वे हा भारतातील पहिला सिंगल पिलर एलिव्हेटेड हाय-वे आहे. याचा १८.९ किमी लांबीचा भाग, हरियाणात तर १०.१ किमी लांबीचा भाग दिल्लीच्या हद्दीत आहे. इंदिरा गांधी आंतरराष्ट्रीय विमानतळाजवळील ३.६ किमीचा बोगदा हा देशातील सर्वात रुंद नागरी बोगदा आहे.

या महामार्गाच्या एकूण ३४ अंडरपास, ३१ बोगदे, १२ रस्त्यावरील पूल आणि बहुपातळी आंतरछेद यामुळे वाहतुकीत क्रांती घडणार आहे. गुरुग्रामहून इंदिरा गांधी टर्मिनल १० मिनिटांत तर दिल्ली-गुरुग्राम हा प्रवास २०-२५ मिनिटांत पूर्ण होणार आहे.

हा ७५.७१ किमीचा, ६-लेनचा महामार्ग असून तो दिल्लीतील अलिपूरपासून द्वारका सेक्टर २४ पर्यंत धावणार आहे. यामुळे गुरुग्राम-सोनीपत प्रवास फक्त ५० मिनिटांत शक्य होणार आहे. या दोन्ही प्रकल्पांमुळे दिल्ली-एनसीआरमधील प्रवास जलद, सुरक्षित आणि आधुनिक होणार असून व्यापार व औद्योगिक संधींना चालना मिळणार आहे.

# नागालँडचे राज्यपाल गणेशन यांचे निधन

■ कोहिमा

नागालँडचे राज्यपाल एल. गणेशन यांचे आज उपचारादरम्यान वयाच्या ८० व्या वर्षी निधन झाले. ८ ऑगस्ट रोजी चेन्नई येथील त्यांच्या घरी अचानक पडल्यामुळे त्यांच्या डोक्याला दुखापत झाली. त्यानंतर त्यांना तातडीने उपचारासाठी चेन्नईच्या खासगी रुग्णालयाच्या आयसीयूमध्ये दाखल करण्यात आले होते. आज उपचार सुरू असताना त्यांनी अखेर श्वास घेतल्याची माहिती राज्यपाल कार्यालयाने दिली. त्यांची फेब्रुवारी २०२३ रोजी नागालँडचे २१ वे राज्यपाल म्हणून नियुक्ती झाली होती.

**नवी मुंबई महानगरपालिका**

जाहीर नोटीस सूचना क्र./वृक्ष प्रा./12/2025-2026

महाराष्ट्र (नागरी क्षेत्र) झाडांचे जतन अधिनियम, 1975 च्या महाराष्ट्र अधिनियमानुसार केलेल्या सुधारणा विचारात घेऊन अधिनियमाच्या कलम 8(3) अन्वये या नोटीसव्दारे असे जाहीर करण्यात येते की,

| अनु. क्र. | अर्जदाराचे नांव व पत्ता | झाडाचा प्रकार | एकूण तोडणे | एकूण स्थलांतरीत | झाड तोडणे/ स्थलांतरीत करावयाचे कारण |
|---|---|---|---|---|---|
| 1 | उप अभियंता (स्थापत्य),जी विभाग ऐरोली, नवी मुंबई महागनरपालिका. | बोर | 1 | 1 | सदरची झाडे टी.टी.सी. औदयोगिक क्षेत्र फेज के, चिंचपाडा यादवनगर, भुखंड क्र. पी-185 येथील स्मशानभुमीच्या बांधकामात अडथळा निर्माण करित असल्याने एकुण 79 झाडांपैकी 5 नग झाडे तोडणे व 55 नग झाडे स्थलांतरित करणे. (टिप:-तसेच कांचन 5 नग, किजिलिया 13 नग, सिंगापुरी चेरी 1 नग, एकुण 19 नग झाडे वाचवणे आवश्यक आहे.) |
| | | बर्डलाईम | 0 | 2 | |
| | | जंगली उंबर | 0 | 5 | |
| | | करंज | 0 | 2 | |
| | | रामफळ | 0 | 1 | |
| | | किजिलिया | 3 | 40 | |
| | | सिंगापुरी चेरी | 0 | 4 | |
| | | सुभाबुळ | 1 | 0 | |
| | | एकुण | 5 | 55 | |

सदर प्रस्तावास वृक्ष तोडणे/स्थलांतरित करण्याची परवानगी देण्याचा वृक्ष प्राधिकरणाचा इरादा आहे. याबाबत नागरीकांच्या काही हरकती तसेच सदर वृक्षांवर पक्षांची घरटी असल्यास जाहिरात प्रसिध्द झाल्यापासून सात दिवसांच्या आत लेखी स्वरूपात से. 3, ऐरोली, नवी मुंबई या विभागास कळविणे. मुदतीनंतर प्राप्त होणाऱ्या हरकती सूचनांचा विचार केला जाणार नाही, याची नोंद घ्यावी.

जाहीरात प्रसिध्दीचा दिनांक 15 / 08 /2025.

सही/-
(नयना ससाणे)
उप आयुक्त (उद्यान परि-2)
नवी मुंबई महानगरपालिका

जा.क्र-नमुंमपा/जसं/जाहिरात/404/2025





# शाहरुख असता तर चित्रपट फ्लॉप झाला असता


'सैयारा' च्या यशानंतर
या सिनेमाचा हिरो अहान पांडे आपले यश साजरे करत असताना टीव्ही व सीरिज अभिनेता वरुण बडोला एक मोठे वक्तव्य केले आहे की, 'सैयारा'मध्ये शाहरुख खान असता तर चित्रपट फ्लॉप झाला असता. अहानने आपल्या अभिनयाचा दाखला या चित्रपटामध्ये दिला असला तरी वरुणने त्याला देखील टोमणा मारला आहे. म्युझिकल रोमँटिक असलेल्या यशस्वी सैयाराची आता आमिर खानच्या चित्रपट 'कयामत से कयामत तक' आणि ऋतिक रोशनच्या सिनेमा कहो ना प्यार है सारख्या चित्रपटांशी तुलना केली जात आहे. काही लोक अहान पांडेला ९० च्या दशकातील सर्वात मोठ्या सुपरस्टार्सच्या संघातील एक मानत आहेत आणि हे देखील सांगत आहेत की, आता 'सैयारा'च्या यशाने हे दाखवून दिले आहे की, चित्रपटांमध्ये आता सुपरस्टार्सची गरज नाही. लोकांची ही वक्तव्ये ऐकून अक्षय कुमारसह मिशन मंगल मध्ये दिसलेला अभिनेता वरुण बडोला म्हणाला की, हे लोक बोलत आहेत की, 'सैयारा'ने दाखवले आहे की, आता आम्हाला मोठ्या स्टार्सची आवश्यकता नाही. परंतु त्यांच्या या म्हणण्याला काहीच अर्थ नाही. आता तुम्ही अहान पांडेला जवान मध्ये टाकून बघा, तो चित्रपट फ्लॉप होईल. शाहरुख खानला 'सैयारा'मध्ये काम करायला सांगितले असते तर 'सैयारा' फ्लॉप झाला असता. कारण किंग खान या चित्रपटासाठी वयस्कर दिसला असता आणि अहानचे असे व्यक्तिमत्व नाही की, तो 'जवान' मध्ये काम करू शकेल. अहानच्या चित्रपट कारकिर्दीच्या भविष्याविषयी बोलताना वरुण बडोला म्हणाला की, अहानची अभिनय कारकिर्द त्याच्या पुढील प्रोजेक्ट्सवर अवलंबून आहे. आदित्य चोप्राचा हा सिनेमा त्याचा पहिला चित्रपट आहे, कारण त्याचा दुसरा चित्रपट बंद पडला होता.

# गुंतागुतीच्या कथेचे प्रभावी सादरीकरण

# तेहरान

परीक्षण

स्वातंत्र्य दिनाचे औचित्य साधत देशभक्तीपर चित्रपटांचे प्रदर्शन ही परंपरा काही आजची नाही. पंधरा ऑगस्ट आणि सव्वीस जानेवारी या खास दिवशी देशभक्तीने ओतप्रेत भरलेले सिनेमे अनेक वर्षांपासून चित्रपटसृष्टी करत आली आहे. हीच परंपरा अभिनेता जॉन अब्राहम आणि दिग्दर्शक अरुण गोपालन यांनी पुढे नेत 'तेहरान' हा चित्रपट ओटीटी प्लॅटफॉर्म झी ५ वर प्रदर्शित केला आहे. 'डिप्लोमॅट' या जॉनच्या यापूर्वी प्रदर्शित झालेल्या सिनेमामध्ये देखील देशभक्तीचे रंग दिसले होते, आणि 'तेहरान' मध्ये देखील तो भारतातील लोकांना अनपेक्षित नुकसानापासून (कोलॅटरल डॅमेज) वाचवण्यासाठी सर्व  सीमा पार करताना दिसतो. 'तेहरान' ची कथा सत्य घटनांवर आधारित आहे. इस्त्रायल , इराण आणि भारत यांच्या राजकीय घटनांच्या अवतीभवती याची कथा बेतली आहे.




## 'तेहरान' चे कथानक

कथा २०१२ पासून सुरू होते. डीसीपी राजीव कुमार आपल्या कुटुंबाला धमकी देणाऱ्या मकवाना गँगच्या म्होरक्याला धडा शिकवून परतत असतो, तेव्हा दिल्लीमध्ये इराणी दूतावासाच्या बाहेर एक बॉम्ब स्फोट होतो व यामध्ये एक फूल विकणाऱ्या मुलीचा मृत्यू होतो. वरवर पाहिलं तर हा एक दहशतवादी हल्ला वाटतो, परंतु राजीव कुमार आपल्या टीमसह याच्या तपासणी मोहिमेवर जातो, तेव्हा समजतं की या कार बॉम्ब स्फोटाचे धागेदोरे इस्त्रायल, इराण आणि भारताच्या राजकीय धोरणाशी जोडलेले आहेत. इस्त्रायल आणि भारत यांच्यामध्ये एक गॅस करार होणार आहे आणि राजीव कुमारने जर इस्त्रायलच्या कारस्थानाचे भांडाफोड केले तर तो करार रद्द होईल.  त्यामुळे भारताच्या राजदूतांचे असे मत पडते  की, राजीव आणि त्याच्या सहकार्यांनी हे मिशन तात्काळ समाप्त करावे. परंतु राजीव आणि त्याच्या साथीदारांनी मात्र जीवाची पर्वा न करता दहशतवाद्यांना धडा शिकवण्याचा जणू संकल्प केला आहे. या मिशनमध्ये राजीवसह एसआय दिव्या  आणि राजदूत शैलजा देखील सहभागी झाल्या आहेत. जसजसे राजीव कुमार व त्याची टीम तपासाच्या जवळ पोहचते,  राजीवच्या लक्षात येते की हा आतंकी हल्ला नसून इराण आणि इस्त्रायलच्या अनेक दशकांच्या लढाईच्या साखळीचा नवा दुवा आहे, ज्यामध्ये भारतासारख्या देशाची स्थिती नाजुक बनली आहे.
मोहिम आपल्या इच्छेप्रमाणे पुढे नेण्याच्या बदल्यात राजकीय समीकरणे, आंतरराष्ट्रीय संबंध आणि राजकीय सीमा आदिंचा विचार करत देश राजीवला एकटे सोडतो व इस्त्रायल आणि इराणमध्ये त्याला जीव वाचवणे कठीण होते. या मिशनमध्ये दिव्याला आपले प्राण गमवावे लागतात. राजीवच्या घरी त्याची मुलगी आणि पत्नी त्याची वाट पाहत आहेत. आपले मिशन पूर्ण करून तो सुखरूप  स्वदेशी परततो का? याचे उत्तर मिळवण्यासाठी प्रेक्षकांना चित्रपट पहावा लागेल.

## कसा आहे सिनेमा?

दिग्दर्शक अरुण गोपालनचा हा चित्रपट एक प्रखर व गुंतागुंतीच्या विषयावर आधारित आहे, जो समजण्यासाठी प्रेक्षकांना भारत, इराण आणि इस्त्रायल यांच्यातील संबंध समजणे आवश्यक आहे. दिग्दर्शकाने २०१२ मध्ये एक लहान कारमध्ये बॉम्ब स्फोटाला सीमेपार नाट्यामध्ये बदलले आहे. खरंतर कथा दिल्लीच्या अरुंद गल्लीतून सुरु होऊन अबुधाबी, इस्त्रायल आणि इराणच्या दुर्बोध परिसरात प्रवेश करते. विषयाला अनुसरून संपूर्ण कथेमध्ये एक जबरदस्त ताण सातत्याने जाणवत राहतो. दिग्दर्शकाने याला थ्रिलरच्या पद्धतीने सादर केले असून ते नाट्याऐवजी वास्तविक दृष्टिकोनासह दाखवले आहे. चित्रपटाची कथा पटकथा लेखन रितेश शाह, आशिष पी. वर्मा आणि बिंदनी करिआ या त्रयीने केले आहे. कथा बरीचशी गुंतागुंतीची असून काही ठिकाणी इराणी आणि इस्त्रायली भाषा अडथळे निर्माण करतात. ठराविक साच्यातील  बॉलीवूड चित्रपट पाहणाऱ्या प्रेक्षकांना हा सिनेमा जड वाटू शकतो. दिग्दर्शक



अरुणने कथेचा भावनात्मक पैलू आणखी मजबूत केला असता, तर चित्रपट अधिक प्रभावी बनला असता. चित्रपट पाहताना उसंत मिळत नाही. अर्थात,दृश्याचा बाज आणि वातावरण हे चित्रपटाच्या चांगल्या गोष्टी आहेत. कॅमेरामन येवगेनी गुबरेबको आणि आंद्रे मेनेजेस यांनी तेहरानच्या अरुंद गल्ल्या, गर्दीने भरलेले बाजार, आणि रहस्यमयी अंधाऱ्या जागा उत्तमरित्या आपल्या कॅमेरामध्ये बंदिस्त केल्या आहेत. वास्तविक लोकेशन कथेला एक उच्च दर्जा देते. क्शन सीक्वेन्स (डग कोलमन आणि अमृतपाल सिंग यांचे नृत्यदिग्दर्शन ) आणि पाठलाग करणारे प्रसंग चांगले बनले आहेत. केतन सोढाचे पार्श्वसंगीत दृष्यांची तीव्रता वाढवणारे आहे.

## अभिनय

राजीव कुमारच्या भूमिकेमध्ये जॉन अब्राहमने खूपच चांगले काम केले आहे. लोकांना आता त्याला नॉन-ऍक्टर म्हणणे बंद करायला हवे. प्रखर व  ॲक्शन असलेल्या देशभक्ताच्या भूमिकांमध्ये जॉनने आता आपला ठसा उमटवला आहे. या सिनेमामध्ये देखील तो प्रामाणिकपणे आपली  व्यक्तिरेखा साकार करताना दिसतो. दिव्याच्या भूमिकेमध्ये मानुषी छिल्लरने योग्य अभिनय केला आहे, तर शैलजाची व्यक्तिरेखा नीरू बाजवाने ठीकपणे केली आहे. दहशवाद्याच्या भूमिकेमध्ये हादी खंजनपूर क्रूर आणि प्रभावशाली वाटतो. जॉनच्या पत्नीच्या लहान भूमिकेमध्ये मधुरिमा तुलीने चांगला अभिनय केला आहे. अन्य कलाकारांनी देखील उत्तम साथ दिली आहे.
जॉनचा दमदार अभिनय आणि देशभक्तीपर चित्रपट म्हणून हा सिनेमा एकदा पहायला हरकत नाही.

**चित्रपट:** तेहरान
**दिग्दर्शक:** अरुण गोपालन
**लेखन:** रितेश शाह, आशिष पी. वर्मा आणि बिंदनी करिआ
**कलाकार:** जॉन अब्राहम, मानुषी छिल्लर, नीरू बाजवा, हादी खंजनपूर, सुशील दहिया
**ओटीटी प्लॅटफॉर्म: झी ५**
**रेटिंग: ३/५**

# चित्रपट फ्लॉप असला तरीही खर्च केले ३१ कोटी



स्टार अभिनेता ऋतिक रोशनचा बहुचर्चित चित्रपट वॉर २ १४ ऑगस्टला प्रदर्शित झाला. परंतु या सिनेमाला प्रेक्षकांचा फारसा प्रतिसाद मिळत नसल्याचे बोलले जात आहे. मात्र तरीही ऋतिकने  एका दिवसात ३१ कोटी रुपये खर्च केले आहेत. राकेश रोशन आणि ऋतिक रोशन या पितापुत्रांनी राकेश रोशन यांची कंपनी एचआरएक्स डिजिटेक एलएलपी ने मुंबईमध्ये कार्यालयाचे तीन  विभाग खरेदी केली आहेत. ही ऑफिस युनिट्स मुंबईच्या चांदीवली परिसरात असून त्यासाठी ऋतिकने तब्बल ३१ कोटी रुपये खर्च केले आहेत. हे ऑफिस युनिट्स पूर्व अंधेरीच्या चांदीवली भागातील बूमरँग बिल्डिंगच्या पहिल्या मजल्यावर आहेत. तीन ऑफिसची जागा तेरा हजार पाचशे स्क्वेयर फीट आहे. ऋतिक रोशन गेल्या काही काळापासून प्रॉपर्टी खरेदी करत आहे. गेल्या वर्षीही त्याने ऋतिकच्या कंपनीने बूमरँग बिल्डिंगमध्ये पाच कार्यालये ३७ कोटी ३७ लाखांना खरेदी केली होती.

# हुनर - मयंक झाले वेगळे



हिंदी मनोरंजन टीव्ही माध्यमामध्ये कुठल्या ना कुठल्या कलाकाराचे वैवाहिक अथवा प्रेमाचे संबंध सातत्याने तुटल्याच्या बातम्या समोर येत असतात. काही महिन्यांपूर्वीच 'क्योंकि सास भी कभी बहू थी' फेम दिग्दर्शक आणि त्याची पत्नी पल्लवी रावने वेगळे होत असल्याची घोषणा केली होती. ये रिश्ता क्या कहलाता है या मालिकेमध्ये अक्षराच्या आईची भूमिका करणारी अभिनेत्री लता सब्रवालसुध्दा लग्नाच्या १५ वर्षांनंतर आपल्या अभिनेता पती संजीव सेठपासून वेगळी झाली. आता या दोन कलाकारांनंतर 'कहानी घर-घर की' या मालिकेद्वारे आपल्या अभिनयाची सुरुवात करणारी लोकप्रिय अभिनेत्री हुनर हालीचा विवाह देखील तुटला आहे. सूत्रांच्या माहितीनुसार, लग्नाच्या नऊ वर्षांनंतर तिने पतीपासून वेगळे होण्याचा निर्णय घेतला आहे. कोण आहे हुनर हालीचा पती?
हुनर हालीने स्प्लिट्सविला सीझन ७ चा विजेता ठरलेला मयंक गांधीसह डेट केल्यानंतर २०१६ मध्ये सीख रितीरिवाजांप्रमाणे विवाह केला होता. परंतु गेल्या काही दिवसांपासून दोघेजण वेगळे झाल्याची बातमी सोशल मीडियावर व्हायरल झाली होती. तिने गेल्या अनेक काळापासून पती मयंक गांधीसह कुठलाही फोटो शेअर केला नव्हता. आता हुनर हाली आणि मयंक गांधीने घटस्फोट घेण्याचा निर्णय घेतला आहे.
हुनर हालीच्या इंस्टाग्रामवरसुध्दा 'गांधी' हे आडनाव बदलून 'हाली' करण्यात आले आहे.




# आलियाच्या 'अल्फा' मध्ये बॉबीची एन्ट्री पक्की


'वॉर २' ला मिळत असलेल्या प्रेक्षकांच्या कमी प्रतिसादाच्या बातमीसह ऋतिक रोशनच्याच अल्फा या चित्रपटाबाबत एक बातमी कायला मिळाली आहे. या चित्रपटामध्ये अभिनेता बॉबी देओल दिसणार आहे. त्याचसोबत हे देखील कळले आहे की, अल्फा मध्ये बॉबी खलनायकाची भूमिका करत आहे. या चित्रपटामध्ये आलिया भट्ट आणि शर्वरी वाघ देखील आहेत. सुरुवातीला या चित्रपटातील खलनायकाच्या भूमिकेसाठी कोणत्या अभिनेत्याची वर्णी लागणार आहे याविषयी फक्त चर्चा सुरू होती. अभिनेत्री शर्वरी वाघने आपल्या इंस्टाग्राम अकाऊंटवर एक पोस्ट शेअर करून बॉबीच्या चित्रपटातील एन्ट्रीबद्दल आनंद व्यक्त केला आहे. बॉबीचा एक फोटो शेअर करत शर्वरीने लिहिले आहे, वाह बॉबी देओल सर!!! तुमचा स्क्रीन प्रेझेंस कमालीचा आहे. 'वॉर २' मध्ये आपला आणि 'अल्फा'चा काय मस्त परिचय केला आहे. यापूर्वी अभिनेत्री आलिया भट्टने आपल्या इंस्टाग्रामवर वॉर २ चा ट्रेलर शेअर करत चाहत्यांची उत्सुकता वाढवली होती. या ट्रेलरखाली तिने लिहिले होते, मस्त, चौदा तारखेला भेटू या. माझ्या घराजवळील चित्रपटगृहामध्ये. त्यावेळी आलिया वॉर २ चे प्रमोशन करत आहे असे युजर्सना वाटले होते परंतु अल्फा मध्ये झालेल्या बॉबीच्या एन्ट्रीनंतर आलियाची पोस्ट या बातमीचे सूतोवाच होते हे आता लक्षात आले  आहे.




# 'तू माझा किनारा'चे पोस्टर प्रदर्शित

तू माझा किनारा या कौटुंबिक मराठी चित्रपटाचे पोस्टर नुकतेच प्रदर्शित करण्यात आले आहे. निळसर आकाश आणि शांत समुद्राच्या पार्श्वभूमीवर हे पोस्टर आहे. या चित्रपटाचे दिग्दर्शन क्रिस्टस स्टीफन यांनी केले आहे. तू माझा किनारा मध्ये वडील आणि मुलीच्या नात्याची हळवी, हृदयाला भिडणारी कथा प्रेक्षकांना पाहायला मिळेल. ही कथा केवळ दोन व्यक्तींमधली नसून घराघरातल्या नात्यांची शांत, न बोललेली भावना आहे. पालकत्वातील प्रेम, समजून घेणे, आणि न बोलता दिला जाणारा आधार हे सगळं या चित्रपटात अत्यंत संवेदनशीलतेने उलगडलं आहे. लवकरच हा सिनेमा प्रदर्शित होणार आहे.

# नवाकाळ शब्दकोडे-१३४४



**आडवे शब्द –**

१. शरद ऋतूतील ४. नागचाफा, भगवान शंकर ८. योगशास्त्रातील शुद्धीक्रियेचा एक प्रकार १२. गळू, अचानक शरीरावर आलेली गाठ १३. चांदी १५. अंश, भाग १७. यज्ञात अग्नीला अर्पण केलेले १८. निगेअभावी गुंता झालेले राठ केस २०. नम्र, झुकलेला २२. ढोंगी, दांभिक २४. कच खाणे, अडखळणे २९. दशावतारापैकी बटु अवतार ३२. नाशिकचे एक पवित्र स्थान, राम-लक्ष्मण-सीता वनवासात असताना काही काळ इथे होते ३३. निबर, जून ३४. पाण्यात बुडी मारणे ३७. उपदेश, सल्ला, माहिती ३८. दिवाळीतली द्वादशी ३९. हडकुळा, कृश ४२. सेविका ४५. कृष्णोपदेश ४७. द्रौपदीचे वडील ४९. मत्स्य ५१. विष्णूमंदिरातील गरुडाच्या मूर्तीची जागा ५२. दारुडा ५५. गणती ५७. संध्याकाळ ५९. जळून खाक ६१. मऊ, मृदू ६३. आवळ्याचे झाड ६४. तिमिर, अंधार ६६. तंगी, पैशांची नड ६८. मोठी नदी ७०. दाढीचे पाते ७२. प्रतिबंध करणे ७४. ज्ञानी, जाणकार ७६. दाट, निबिड ७७. दयाळू ७९. जाडेभरडे कापड ८१. माळजमीन ८२. संसार, विश्व ८६. बाहू, हात ८७. वगळलेले ८८. गव्हाच्या चिकापासून तयार केलेला वाळवणाचा पदार्थ ८९. दुर्गादेवीचे एक नाव ९०. लोकनाट्य ९१. फुटाचा बाराचा भाग ९२. एक द्रवरूप धातू, पारा ९३. वृष्टी ९४. पक्षीराज, गरूड ९६. थडगे असलेली वास्तू ९९. लेखी करार १०२. पाच पाकळ्या असलेले पांढरे बिनवासाचे फूल १०४. आयुष्य, जीवन १०५. लग्न न झालेला १०७. हक्क सांगणारा १०८. रमलेला १०९. नर्तकीचा अलंकार ११०. जादू करणारा १११. यथेच्छ ११२. युक्ती

**उभे शब्द –**

१. कापसाची एक जात, सावरी २. नवऱ्याचा भाऊ ३. कारभारी, कुटुंबप्रमुख ५. भुरळ पडेल असे ६. मीठ, लोणची ठेवण्यासाठी चिनीमातीचे भांडे ७. नियंत्रण ९. अभ्यागत १०. वाईट सवय ११. तृतीया १४. शरीर १६. साय १९. स्वच्छता २१. कोरा, न वापरलेला २३. चुलीमागचा ओटा २५. फळातील खाद्यभाग २६. होऊन गेलेले २७. मागणी २८. पळून गेलेला, पत्ता ठाऊक नसलेला ३०. बेत, हेतू ३१. धाडसाचे काम ३२. पाचवा सूर ३४. निष्फळ आक्रोश ३५. गुडघ्याच्या खालचे हाड ३६. योजना, नियोजन, घाट ४०. कपटी, कुटिल ४१. ठोक, मार ४३. सरहद्द ४४. पायांपासून मस्तकापर्यंत ४६. जोरात मारलेली हाक ४७. झाड, वृक्ष ४८. सतरंजी, अंतर, दोन डोंगरांमधील सखल जमीन ५०. त्रिकोणी आकाराचा तळलेला तिखट पदार्थ ५१. भीमाचे प्रिय शस्त्र ५२. शिव्याशाप ५३. बन, जंगल ५४. ढोंग, थोतांड ५६. जपून ठेवणे ५७. सामान्य, अनलंकृत ५८. दोन डोंगरांमधली चिंचोळी वाट ६०. आठवण ६२. ध्वनी, आवाज ६५. सत्तावीसपैकी दहावे नक्षत्र ६६. तांबड्या-पांढऱ्या फुलांचे एक झाड ६७. ख्याती ६९. पाषाण ७१. भयभीत, व्याकूळ ७३. लाट, अचानक झालेली इच्छा ७४. जाईचे फूल ७५. त्वरित ७८. प्रवेश करण्यासाठी जागा ८०. चिलखत ८२. समृद्धी, वैभव ८३. एकूण ८५. अठरापैकी चौथे पुराण, एक आडनाव ८६. दृढ व मजबूत ८९. विद्येची देवी ९०. सहापैकी पावसाचा ऋतू ९१. रावणाचा मुलगा ९३. दैवी शक्ती, आशीर्वाद ९५. स्वार्थी ९७. टपरीवर मिळणारा चहाचा सर्वात छोटा कप ९८. पौर्णिमा १००. भिस्त १०१. गुरांना बांधायचा दोर १०३. सखोल १०६. नृपती १०८. रुधिर •

**नवाकाळ कोडे क्रमांक १३४३चे उत्तर**

**आडवे शब्द** : १. प्रभा ३. लाभ ४. पथिकाश्रम १०. जिव्हा ११. चंगीभंगी १४. टाळ १५. गयावया करणे १८. परतफेड २१. वीज २३. दीर २४. वासा २६. मूक २७. सदरा २८. टपरी २९. जहर ३१. कैक ३२. हिंग ३३. भावी ३४. वर्ज्य ३५. पत्रास ३६. सफर ३८. रगड ४०. एकनाथ ४२. तडाखा ४४. टीकाकार ४६. वारा ४७. मामुली ४८. उडी ४९. पूर ५१. वनचर ५४. दिमाख ५५. पूर्व ५६. ग्रोस ५७. सुवर्ण ५८. बल्लव ६०. शील ६२. अमली ६३. पुनवडी ६५. सहजगत्या ६७. उपवन ६९. पाट ७०. मोगरी ७१. तवा ७२. हानी ७४. पुच्छ ७५. वसंत ७७. नारळ ७८. पोट ७९. मळवट ८१. जिलबी ८२. कुलदैवत ८४. गुंग ८५. जाणे ८६. गय ८८. कव ८९. रीस ९१. डाका ९३. रूढ ९४. यार ९५. चमेली ९७. वाळू ९८. कातर १००. रेशीम १०२. पलायनवादी १०६. संघर्ष १०७. आणखी १०८. वर्चस्व ११०. सहस्रावधी १११. कमळजा ११२. पढतमूर्ख

**उभे शब्द** : १. प्रचंड २. भागी ३. लागीर ५. थिटा ६. काळवीट ७. मग ८. वावरजत्रा ९. एकवार १०. जिणे १२. भंपक १३. सफेद १६. यादी १७. रसा १९. तसवीर २०. डरावडराव २२. जपणूक २५. बाकरवडी २६. मूग ३०. हसतमुख ३१. कैफ ३२. हिंपुटी ३५. पथ ३६. सखा ३७. बेकार ३९. गवा ४०. एवंच ४१. नाडी ४३. डाली ४५. कापूस ४७. मामा ४८. उर्वशी ५०. इवली ५२. नयन ५३. रबडी ५४. दिवसगत ५७. सुमन ५९. गगन ६१. लडिवाळ ६२. अवनी ६३. पुटपुटणे ६४. वधू ६६. हरी ६८. पहाट ७०. मोसंबी ७१. तरतरी ७३. खोळ ७५. वलय ७६. पुलक ७७. नाव ७८. पोवाडा ७९. मगरूर ८०. वजा ८१. जिगर ८३. दैववादी ८७. अमेय ९०. सट्टा ९२. काका ९४. याम ९५. चलाखी ९६. लीन ९९. तमिस्रा १००. रेघ १०१. शीर्षक १०२. पणजा १०३. वाह्यात १०४. चर्च १०५. दिस १०६. संधी १०७. आळ १०८. वर्ख १०९. स्वये

# दिवाळीत जीएसटी कमी करणार! मोदींची घोषणा

पान १ वरून

देशातील जमीन तहानलेली आहे. सात दशकांपासून या एकतर्फी आणि अन्यायकारक सिंधू जलकराराने आमच्या वाट्याचे पाणी हिरावून नेले. परंतु भारत हे सर्व सहन करणार नाही.

आगामी दहा वर्षांत म्हणजेच सन २०३५ पर्यंत देशातील सर्व महत्त्वाची स्थळे, सरकारी रुग्णालये, रेल्वे आणि धार्मिक स्थळांना आधुनिक तंत्रज्ञानाच्या साह्याने सुरक्षा कवच पुरवले जाईल. त्यासाठी भगवान श्रीकृष्णाकडून प्रेरणा घेऊन त्यांच्या सुदर्शन चक्राचे अनुकरण करण्याचे आम्ही ठरवले आहे. आम्ही लवकरच मिशन सुदर्शन चक्र सुरू करणार आहोत. हे सुदर्शन चक्र म्हणजे एक अत्यंत सक्षम अशी संरक्षण यंत्रणा असेल जी शत्रुचे हल्ले निकामी करण्याबरोबरच शत्रुवर वारदेखील करील,असे मोदी म्हणाले.

उद्योन्मुख शास्त्रज्ञ, अभियंते आणि शासकीय विभागांना मोदी यांनी मेड इन इंडिया जेट इंजिन बनवण्याचे आव्हान यावेळी केले. आपल्या मेड इन इंडिया फायटर जेट विमानासाठीचे इंजिनही आपणच बनवले पाहिजे, अशी इच्छा मोदी यांनी व्यक्त केली.

उद्योन्मुख शास्त्रज्ञ, अभियंते आणि शासकीय विभागांना मोदी यांनी मेड इन इंडिया जेट इंजिन बनवण्याचे आव्हान यावेळी केले. आपल्या मेड इन इंडिया फायटर जेट विमानासाठीचे इंजिनही आपणच बनवले पाहिजे, अशी आशा मोदी यांनी व्यक्त केली.

चालू वर्षाच्या अखेरीस मेड इन इंडिया सेमी कंडक्टर चीप बाजारात उपलब्ध होतील असा दावाही मोदींनी केला. भारतात सेमी कंडक्टर चीप निर्मितीचा कारखाना सुरू करण्याचा विचार ५०-६० वर्षांपूर्वी पहिल्यांदा झाला होता. मात्र ही योजना रखडली. आमच्या सरकारने युध्द पातळीवर सेमी कंडक्टर उद्योगावर काम सुरू केले आहे. सध्या सहा चीप प्रकल्पांची उभारणी प्रगतीपथावर आहे. तर आणखी चार प्रकल्पांना मंजुरी देण्यात आली आहे, असेही मोदी यांनी सांगितले.

# शक्तिपीठ महामार्गाविरोधात कोल्हापुरात शेतात ध्वजारोहण

पान १ वरून


तालुक्यांत स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे अध्यक्ष माजी खासदार राजू शेट्टी यांच्या नेतृत्वात आंदोलन झाले.

आमदार सतेज पाटील म्हणाले की, या महामार्गाची शेतकऱ्यांना अजिबात गरज नाही. या महामार्गामुळे सुपीक शेती गिळंकृत होऊन अल्पभूधारक शेतकऱ्यांचे जीवन उद्ध्वस्त होणार आहे.

सरकारने या प्रकल्पासाठी नियोजित असलेला पैसा कर्जमाफीसाठी वापरावा आणि बारा जिल्ह्यांतील शेतकऱ्यांना या शक्तिपीठाच्या ओझ्यातून मुक्त करावे. तर माजी खासदार राजू शेट्टी म्हणाले की, रत्नागिरी-नागपूर महामार्ग तोट्यात असताना, ५० हजार कोटींचा नवीन महामार्ग जनतेवर लादण्याचा अट्टाहास सरकार करत आहे. हा महामार्ग मुठभर उद्योगपतींसाठी असून ९० वर्षे टोल भरण्याचे संकट जनतेवर येणार आहे.

# भांडूप दहीहंडीला हायकोर्टाचा नकार! शिंदे गटाला दणका

■ मुंबई



**भांडुपमध्ये** दहीहंडी उत्सव आयोजित करण्यासाठी परवानगी मिळावी या मागणीसाठी उच्च न्यायालयात गेलेल्या शिवसेना शिंदे गटाला दणका बसला आहे. न्यायमूर्ती गिरीश कुलकर्णी आणि न्यायमूर्ती डॉ. आरिफ यांच्या खंडपीठाने ही याचिका फेटाळून लावली.

शिवसेना शिंदे गटाचे स्थानिक कार्यकर्ते संदीप जळगावकर यांनी भांडूप पश्चिम येथील लाला शेठ कंपाऊंडजवळ अशोक केदारे चौक येथे दहीहंडी उत्सवाचे आयोजन केले होते. यासाठी भांडूप पोलीस, आरटीओ आणि अग्निशमन विभागाकडून ना हरकत प्रमाणपत्र मिळाले होते. मात्र महापालिकेकडून परवानगी मिळाली नसल्याने ॲड. प्रतीक सबराड व ॲड. अमेय सावंत यांच्यामार्फत उच्च न्यायालयात याचिका दाखल केली होती.

या याचिकेवरील सुनावणीत न्यायालयाने स्पष्ट सांगितले की, कायदा आणि सुव्यवस्थेच्या दृष्टीने पालिकेचा निर्णय महत्त्वाचा आहे. न्यायालय त्यात हस्तक्षेप करू शकत नाही. त्यामुळे शिंदे गटाच्या दहीहंडी उत्सवाच्या आयोजनाला परवानगी मिळाली नाही.

# मांसबंदीविरोधात कोंबडी मोर्चा जलील-आव्हाडांची मटण पार्टी

पान १ वरून

निर्णयांवर आम्ही प्रशासनाला जाग आणू, असा इशारा दिला. यावेळी पोलिसांनी सर्व आंदोलकांना ताब्यात घेतले. मांसविक्री आदेशाच्या पार्श्वभूमीवर संभाजीनगर, नागपूर व मालेगावात बंद पाळण्यात आला. नागपूरमधील काही खाटिकांनी एक दिवस दुकाने बंद ठेवल्याने फरक पडत नाही, असे मत व्यक्त केले. मात्र अमरावती व नाशिकमध्ये मांसविक्रीची दुकाने सुरू होती. कल्याणमध्ये जितेंद्र आव्हाड यांनी हॉटेलमध्ये मांसाहारी जेवण करून मांसबंदीला विरोध दर्शवला. पत्रकार परिषदेत त्यांनी शासन आदेशात विक्रीबंदीचा उल्लेख नसल्याचे सांगत, प्राणी म्हणजे चार पायांचे जनावर, कोंबडी हा पक्षी आहे, अशी टीका केली. त्याचप्रमाणे, इम्तियाज जलील यांनीही बंदीचा निषेध नोंदवत आपल्या घरी मटन-चिकन बिर्याणी पार्टी आयोजित केली. या पार्टीला मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि संभाजीनगरचे पालिका आयुक्त यांना निमंत्रण दिले होते. त्या दोघांच्या नावाच्या पाट्या आणि खुर्च्यादेखील ठेवल्या होत्या.

# किश्तवाडमध्ये मृतांचा आकडा ६५! अनेकजण जखमी

पान १ वरून

चालणार होती.

यात्रेच्या सुरुवातीच्या टप्प्यावरच झालेल्या या दुर्घटनेमुळे मचैल माता यात्रा तात्पुरती स्थगित केली आहे. या दुर्घटनेत आतापर्यंत १६७ जणांना वाचवण्यात यश मिळाले आहे. त्यातील ३८ जण गंभीर जखमी आहेत. मृतांपैकी २१ जणांची ओळख पटली आहे.

मुख्यमंत्री उमर अब्दुल्ला आज किश्तवाड येथे जाण्यासाठी रवाना होणार आहेत. उद्या ते चाशोटी या दुर्घटनास्थळाचा आढावा घेणार आहेत. याशिवाय नायब राज्यपाल मनोज सिन्हा आणि पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी या घटनेबाबत संवेदना व्यक्त करून मदतीसाठी प्रशासन सज्ज असल्याचे सांगितले आहे. या दुर्घटनेमुळे किश्तवाड जिल्हा प्रशासनाने स्वातंत्र्यदिनाचे सांस्कृतिक कार्यक्रम रद्द करून केवळ ध्वजारोहण आणि राष्ट्रगीतापुरतेच कार्यक्रम मर्यादित केले आहेत.

चाशोटी येथे ढगफुटीतून वाचलेले राकेश शर्मा यांनी सांगितले की, मी मुलासह ढिगाऱ्याखाली अडकलो होतो. परंतु लाकडाचा एक मोठा तुकडा आमच्यावर पडला. त्यामुळे आमचे प्राण वाचले. तर जम्मूच्या ३२ वर्षीय स्नेहा यांनी सांगितले की, आम्ही आमच्या वाहनांजवळ सामान ठेवत होतो. अचानक आम्हाला मोठा स्फोट ऐकू आला आणि डोंगरावर ढग फुटताना दिसले. यानंतर पूर आला आणि माझ्यासह कुटुंबातील आणखी चार सदस्य वाहून गेले. चिखल, दगड आणि झाडांसह पाणी आम्हाला चिनाब नदीत वाहून गेलो. आम्ही सर्व चिखलात गाडले गेलो. मी एका वाहनाखाली अडकले होते. माझ्याभोवती मृतदेह होते. त्यापैकी काही मुलांची मान, तर काहींचे हात-पाय तुटलेले होते. सर्व काही संपल्यासारखे वाटत होते. माझ्या वडिलांनी आधी स्वतःला वाचवले, नंतर मला मदत केली. मी माझ्या आईला विजेच्या खांबाखालून बाहेर काढले. ती गंभीर जखमी आणि बेशुद्ध होती.

# द. आफ्रिकेच्या राष्ट्रपतींकडून मोदींना जल गुंतवणूक परिषदेसाठी आमंत्रण

■ केपटाऊन

**दक्षिण** आफ्रिकेचे राष्ट्रपती सिरिल रामाफोसा यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी तसेच इतर जागतिक नेत्यांना ग्लोबल आउटलुक



कौन्सिल ऑन वॉटर इन्व्हेस्टमेंट्स या परिषदेत सदस्य म्हणून सहभागी होण्याचे आमंत्रण दिले आहे. जी-२० अंतर्गत सुरू झालेल्या या नव्या जागतिक उपक्रमाचा उद्देश जल गुंतवणुकीला राजकीय आणि आर्थिक चर्चेच्या केंद्रस्थानी आणणे हा आहे. या प्लॅटफॉर्मद्वारे जी-२०, संयुक्त राष्ट्र, बहुपक्षीय विकास बँका आणि खासगी क्षेत्र यांच्यासोबत भागीदारी करून जल गुंतवणुकीच्या प्रगतीचे परीक्षण केले जाईल आणि त्यावर वार्षिक अहवाल सादर केला जाईल. रामाफोसा यांनी सांगितले की, या कौन्सिलमध्ये पंतप्रधान मोदींसह ब्राझीलचे राष्ट्रपती लुइझ इनासिओ लूला दा सिल्वा, मेक्सिकोच्या राष्ट्रपती क्लॉडिया शेनबाउम, सौदी अरेबियाचे क्राउन प्रिन्स मोहम्मद बिन सलमान, ऑस्ट्रेलियाचे पंतप्रधान अँथनी अल्बनीज, ब्रिटनचे पंतप्रधान कीअर स्टार्मर, जर्मनीचे चान्सलर फ्रेडरिक मर्ज, इटलीच्या पंतप्रधान जॉर्जिया मेलोनी, युरोपियन आयोगाच्या अध्यक्ष उर्सुला वॉन डेर लेयेन तसेच आफ्रिकेतील अनेक देशांचे नेते सहभागी होणार आहेत. ही परिषद जागतिक स्तरावर पाण्याच्या सुरक्षित आणि शाश्वत वापरासाठी गुंतवणुकीचे मार्ग मोकळे करण्याच्या उद्दिष्टाने कार्य करणार आहे.

# विदर्भ आणि मराठवाड्यात मुसळधार पावसामुळे पूरस्थिती

पान १ वरून

गावांतील शाळकरी विद्यार्थ्यांना पावसामुळे झेंडावंदन सोहळ्याला जाता आले नाही.

परभणी जिल्ह्यातील पूर्णा तालुक्यातील मुंबर परिसरात झालेल्या मुसळधार पावसाने नदी-नाल्यांना पूर आला आहे. हिंगोली जिल्ह्यात दोन दिवसांच्या उघडीपीनंतर पुन्हा पावसाने दमदार पुनरागमन केले आहे. वसमत तालुक्यासह अन्य भागांत जोरदार पाऊस कोसळला.

बीडमध्ये मागील दोन दिवसांपासून सुरू असलेल्या मुसळधार पावसामुळे बीड आणि धाराशिव जिल्ह्याच्या सीमेवरून वाहणाऱ्या मांजरा नदीने रौद्ररुप धारण केले आहे. नदीचे पाणी ओसंडून वाहत असून केज तालुक्यातील बोरगाव परिसरातील शेकडो एकर वरील उभी पिके पाण्याखाली गेली आहेत.

गुरुवारी रात्रीपासून मांजरा नदीच्या पाणी पातळीत वाढ होत आहे.नदीचे पाणी वेगाने काठालगतच्या शेतांमध्ये घुसल्याने पिकांचा चिखल झाला आहे. शेतकऱ्यांचे अतोनात नुकसान झाले आहे.शेंगा भरण्याच्या स्थितीत असलेले सोयाबीनचे पीक कुजण्याची भीती निर्माण झाली आहे. बोंडे लागलेला कापूस पाण्यामुळे सडण्याच्या बेतात आहे. काढणीला आलेली ही पिके शेतकऱ्यांच्या डोळ्यादेखत नष्ट झाली आहेत.

# स्वातंत्र्यदिनी ६ ठिकाणी आत्मदहनाचा प्रयत्न

पान १ वरून

मागणी या महिलेने केली. पोलिसांनी हस्तक्षेप केल्याने हा अनर्थ टळला. सोलापुरात गौरव पवार या युवकाने जिल्हाधिकारी कार्यालयासमोर आत्मदहनाचा प्रयत्न केला. त्याला पोलिसांनी ताब्यात घेतले असून आत्मदहनामागील कारण अद्याप स्पष्ट झालेले नाही.

इंदापूरमध्ये पूजा शिंदे या युवतीने जमिनीच्या वादामुळे प्रशासनाकडे वारंवार निवेदन दिल्यानंतरही न्याय मिळत नसल्याच्या कारणाने ध्वजारोहणादरम्यान आत्मदहनाचा प्रयत्न केला.

वर्ध्यात कंत्राटदार बाबा जाकीर यांनी थकीत देयकांच्या विरोधात सार्वजनिक बांधकाम विभागाच्या कार्यालयात आत्मदहनाचा प्रयत्न केला. कोट्यवधींच्या कामांनंतरही बिलासाठी लाच मागितल्याचा आरोपही त्यांनी केला. या सर्व घटनांनी नागरिकांतील असंतोष आणि प्रशासनाच्या दुर्लक्षाचा गंभीर मुद्दा स्पष्ट झाला आहे.

# मुंबई, ठाणे, नाशिकमध्ये ठाकरे बंधू एकत्र लढणार

पान १ वरून

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांसारख्या प्रवृत्ती महाराष्ट्र आणि मराठी माणसाला नामर्द करण्याचा कसोशीने प्रयत्न करत आहेत. स्वाभिमानाच्या प्रश्नावर मराठी माणूस लढायला उठू नये असे त्यांना वाटते. पण महाराष्ट्र स्वाभिमानी आहे. कधी काय खायचे, काय प्यायचे आणि कधी तलवार उपसायची हे आम्हाला ठाऊक आहे. ती तलवार ठाकरे बंधूंनी उपसली आहे आणि त्यातून महाराष्ट्राची मर्दानगी उसळून बाहेर येईल.

# मेहुल चोक्सीची सुनावणी बँकांच्या सहभागास परवानगी

पान १ वरून

रक्कम येणे बाकी असल्याचे म्हटले आहे. विशेष न्यायालयाचे न्यायाधीश ए. व्ही. गुजराथी यांनी बँकांच्या अधिकाऱ्यांना सुनावणी दरम्यान उपस्थित राहण्याचे निर्देश दिले आहे. या दोन्ही बँकांनी चोक्सीच्या जप्त केलेल्या मालमत्तेच्या विक्रीतून आपली फसवणूक झालेली रक्कम मिळवण्यासाठीची विनंती एका वेगळ्या अर्जाद्वारे केली होती. राज्याच्या कर विभागाच्या आयुक्तांनी या प्रस्तावाला विरोध केला होता. त्यांनी म्हटले होते की, या बँकांना अशी मागणी करण्याचा अधिकार नाही. राज्य कर विभागाचे आयुक्त व बँका या मालमत्तेच्या रकमेची मागणी करत असल्यामुळे दोघांचेही म्हणणे ऐकून घेणे आवश्यक असल्याचे न्यायालयाने म्हटले आहे. त्यामुळे या बँकांनाही परवानगी देण्यात आली आहे.

# पश्चिम बंगालमध्ये अपघात! १० यात्रेकरूंचा मृत्यू

■ कोलकाता

**पश्चिम** बंगालच्या बर्दवानमध्ये झालेल्या भीषण अपघातात दहा यात्रेकरुंचा मृत्यू झाला आहे. या दुर्घटनेत ३५ जण गंभीर जखमी झाले असून त्यांना नजीकच्या रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे.

पश्चिम बंगालमधील काही यात्रेकरू दर्शनासाठी गंगासागर येथून स्नान करुन दुर्गापूरला जात होते. आज सकाळी सात वाजण्याच्या सुमारास त्यांची बस बर्दवान येथील फागुनपूरच्या जवळ आली असता एका डंपरला जाऊन आदळली. हा अपघात इतका भीषण होता की, यात दहा जणांचा जागीच मृत्यू झाला. अपघातग्रस्तांच्या किंकाळ्या ऐकून स्थानिकांनी धाव घेत बचावकार्य सुरू केले. त्यानंतर पोलीस प्रशासनाच्या



मदतीने जखमींना तातडीने रुग्णालयात दाखल केले. या अपघातातील अनेक जण गंभीर जखमी असून मृतांचा आकडा वाढण्याची शक्यता आहे.

नवा काळ
• मुंबई । शनिवार १६ ऑगस्ट, २०२५ • पान -८

# दिल्लीत पाच रुपयांत जेवण मिळणार



**नवी दिल्ली -** दिल्लीच्या मुख्यमंत्री रेखा गुप्ता यांनी दिल्लीत पाच रुपयांत जेवण देणाऱ्या अटल कँटीन योजनेची घोषणा केली आहे. या योजनेद्वारे कामगारांना केवळ ५ रुपयांत जेवण दिले जाणार आहे. महाराष्ट्रात उद्धव ठाकरे यांनी आणलेल्या १० रुपयांत मिळणाऱ्या शिवभोजन थाळीप्रमाणेच या योजनेचे रूप असेल. गरिबांना भोजन देणाऱ्या योजना आतापर्यंत अनेक राज्य सरकारांनी राबवलेल्या आहेत. महाराष्ट्रात झुणका भाकर केंद्र त्यानंतर शिवभोजन थाळी अशी योजना आहे, तर तामिळनाडूत जयललिता यांनी अम्मा ईडली या नावाने १ रुपयात इडली देण्याची योजना चालवली होती. दिल्ली सरकारने अटल कँटीन योजनेसाठी यंदाच्या अर्थसंकल्पात या योजनेसाठी १०० कोटी रुपयांचा निधी राखून ठेवला असून त्यातून १०० अटल कँटीन उभारण्यात येणार आहेत.



शांतीनगरचा गजवक्र आणि ॲण्टॉप हिलचा इच्छापूर्ती गणेश यांचे आज रिमझिम पावसात उत्साहात आगमन झाले. (छाया : दीपक साळवी )





गणरायाच्या जयघोषात अनेक गणेशोत्सव मंडळांनी आपल्या लाडक्या बाप्पांची मूर्ती कार्यशाळेतून मंडपास्थळी वाजत-गाजत नेली.

## गोरेगाव-मुलुंड जोडरस्त्यासाठी फिल्मसिटीतील झाडे तोडणार

**सुप्रीम कोर्टाची मंजुरी**

■ मुंबई

**मुंबईची** पूर्व आणि पश्चिम उपनगरे जोडणारा गोरेगाव-मुलुंड जोडरस्त्याच्या (जीएमएलआर) निर्मितीसाठी गोरेगावच्या चित्रनगरीतील (फिल्मसिटी) ९५ झाडे तोडण्यास सर्वोच्च न्यायालयाने मंजुरी दिली. मात्र तोडण्यात येणाऱ्या झाडांच्या बदल्यात तेवढीच झाडे लावण्याच्या अटीवर न्यायालयाने ही परवानगी दिली आहे.

जीएमएलआरच्या मार्गात अडथळा ठरणारी ही झाडे तोडण्याची परवानगी मुंबई महानगरपालिकेने सर्वोच्च न्यायालयाकडे मागितली होती. या प्रकरणी मागील सुनावणीदरम्यान २९ जुलै रोजी न्यायालयाने पर्यावरण आणि विकास याचा समतोल साधण्याची आवश्यकता असल्याचे मत व्यक्त करून पालिकेच्या वृक्ष प्राधिकरणाला यासंबंधी निर्णय घेण्याची अनुमती दिली होती. त्यानुसार वृक्ष प्राधिकरणाने पर्यायी वृक्षारोपण करण्याच्या अटीवर पालिकेला परवानगी दिली. अंतिम मंजुरीसाठी याचिकेवर सरन्यायाधीश भूषण गवई आणि न्या. के. विनोद चंद्रन यांच्या खंडपीठासमोर आली असता न्यायालयाने अंतिम मंजुरी दिली.

दरम्यानच्या काळात सर्वोच्च न्यायालयाने मुंबईच्या वन संरक्षकांना पर्यायी वृक्षारोपणाबद्दल सविस्तर अहवाल सादर करण्याचे आदेश दिले आहेत.

## संविधानाचाही जरा विचार करा भुजबळांचा जरांगेंना खोचक टोला

■ मुंबई

**मराठा** आरक्षणासाठी यावेळी आरपारचा लढा द्यायचा आहे, असा निर्धार मराठा आंदोलक मनोज जरांगे यांनी केला आहे. यावेळी २९ ऑगस्ट रोजी ते मुंबईत धडकणार आहेत. मराठ्यांची पोरे आता थांबणार नाहीत, असे जरांगे म्हणत आहेत.

जरांगेंच्या ओबीसींमधून आरक्षण घेण्याच्या भूमिकेला सातत्याने विरोध करणारे छगन भुजबळ यांनी या आंदोलनावरून जरांगेंवर खोचक टीका केली आहे. खुशाल मुंबईत ये. कोण अडवतो तुला. जालन्यात आंदोलन कर, अंतरवाली सराटीत कर, मुंबईत कर किंवा राजधानी दिल्लीत कर. देशात लोकशाही आहे.

कोणीही कुठेही आंदोलन करू शकतो. परंतु ज्या संविधानाने तुम्हाला उपोषण करण्याचा, लोक जमवण्याचा, भाषण करण्याचा अधिकार दिला आहे, त्याच संविधानाने हे सुध्दा सांगितलेले आहे की, जे वेगवेगळे घटक आहेत त्यांनी एकमेकांवर कुरघोडी करता कामा नये. हे देखील लक्षात ठेव, असे भुजबळ म्हणाले.

## लातूरमध्ये खाजगी बसला भीषण आग

**लातूर-** औसा शहरातील मुख्य रस्त्यावर आज सकाळी प्रवाशांनी भरलेल्या पुणे-लातूर ट्रॅव्हल्सच्या बसला अचानक आग लागली. हाश्मी चौकाजवळून बस जात असताना इंजिनमधून अचानक धूर निघू लागला. प्रसंगावधान राखून चालकाने तत्काळ बस थांबवून सर्व प्रवाशांना सुरक्षित खाली उतरवले. काही क्षणांतच टायर फुटल्याने आगीने रौद्र रूप धारण केले आणि संपूर्ण बस जळून खाक झाली. सुदैवाने एकाही प्रवाशाला इजा झाली नाही, मात्र त्यांचे सर्व सामान पूर्णतः जळून गेले.

## खेवलकरांवर आणखी एक गुन्हा महिलेचा चोरून व्हिडिओ काढला

■ पुणे

**पुण्यातील** रेव्ह पार्टी प्रकरणात शरद पवार गटाचे ज्येष्ठ नेते एकनाथ खडसे आणि महिला प्रदेशाध्यक्ष रोहिणी खडसे यांचे पती डॉ. प्रांजल मनीष खेवलकर यांच्या अडचणीत आणखी वाढ झाली आहे. त्यांच्यावर आणखी एक गुन्हा दाखल करण्यात आला आहे. एका महिलेने पुणे सायबर पोलिसांकडे तक्रार दाखल करत, खेवलकर यांनी तिच्या संमतीशिवाय आक्षेपार्ह व्हिडिओ चोरून काढला आणि त्याचा चुकीचा वापर केला, असा गंभीर आरोप केला आहे.

या तक्रारीनंतर सायबर पोलिसांनी खेवलकर यांच्यावर माहिती तंत्रज्ञान कायदा कलम ६६-ई आणि भारतीय न्याय संहिता कलम ७७ अंतर्गत गुन्हा नोंदवला आहे. याआधीही ड्रग प्रकरणासह अनेक गुन्हे त्यांच्यावर नोंदवण्यात आले आहेत. नव्या गुन्ह्याप्रकरणी पुणे सायबर पोलिसांकडून तपास सुरू आहे. दरम्यान, महिला आयोगाच्या अध्यक्षा रुपाली चाकणकर यांनी पत्रकार परिषद घेऊन खेवलकर यांच्यावर कठोर कारवाईची मागणी केली आहे.

## विक्रोळीत कंत्राटी बेस्ट बसला आग

■ मुंबई

**विक्रोळी** स्थानकातून कन्नमवार नगरकडे जाणाऱ्या कंत्राटी बसमध्ये आज दुपारी साडेबारा वाजताच्या सुमारास वायरिंग जळाल्याने आग लागली. प्रगती विद्यालयाजवळ बस आल्यानंतर अचानक चालकाच्या केबिनमध्ये धूर पसरला.

चालक आणि वाहक यांनी प्रसंगावधान राखत बसमधील अग्निशामक सिलिंडरचा वापर करत आगीवर नियंत्रण मिळवले. बसमधील प्रवाशांना चालक-वाहकाच्या सतर्कतेमुळे बसमधून सुरक्षित बाहेर काढण्यात आले. त्यानंतर अग्निशमन दलाला त्वरित या घटनेची माहिती दिली.

## आयपीएस रश्मी करंदीकरांच्या पतीविरोधात आरोपपत्र दाखल

■ मुंबई

**सरकारी** कोट्यातील घरे मिळवून देतो. सरकारी निविदा मिळवून देतो, अशी आश्वासने देऊन लोकांची कोट्यवधी रुपयांचा फसवणुकीचा आरोप असलेल्या पुरुषोत्तम चव्हाण यांच्याविरोधात मुंबई पोलिसांच्या आर्थिक गुन्हे शाखेने ५ हजार पानांचे आरोपपत्र सादर केले आहे. चव्हाण हे आयपीएस अधिकारी रश्मी करंदीकर यांचे पती आहेत.

पुरुषोत्तम चव्हाण यांच्या विरोधात एकूण २४ कोटी रुपयांची फसवणूक केल्याचा आरोप असून या गुन्ह्यात रश्मी करंदीकर यांचा कोणताही सहभाग नसल्याचे पोलिसांनी आरोपपत्रात म्हटले आहे. चव्हाण यांच्याविरोधात शीव येथील व्यवसायिक केदार देगवेकर यांनी तक्रार दाखल केली होती. त्यांना प्रभादेवी इथे सरकारी कोट्यातून स्वस्तात फ्लॅट मिळवून देण्याचे आमिष दाखवून चव्हाण यांनी पैसे घेतले होते. त्यानंतर एका फ्लॅटचे बनावट खरेदीखत तयार केले. आपली फसवणूक झाल्याचे लक्षात आल्यानंतर देगवेकर यांनी गुन्हा दाखल केला. पोलीस चौकशीत त्यांनी इतरांचीही अशाच प्रकारे फसवणूक केल्याचे निष्पन्न झाले. दरम्यान चव्हाण याला गेल्यावर्षी ईडीने २६३ कोटी रुपयांच्या आयटी टीडीएस घोटाळ्याप्रकरणी अटक केली होती. या सर्व आरोपांचे एकूण ५,००० पानांचे आरोपपत्र त्यांच्या विरोधात दाखल करण्यात आले आहे.

## काँग्रेसचे प्रवक्ते अतुल लोंढे यांना जीवे मारण्याची धमकी

■ नागपूर

**काँग्रेसचे** प्रवक्ते अतुल लोंढे यांना अज्ञात इसमाने फोनवरून जीवे मारण्याची धमकी दिली आहे. लोंढे यांनी याबाबत माहिती देताना सांगितले की, एका नंबरवरून त्यांना सातत्याने फोन आले. अर्वाच्च शिवीगाळ करण्यात आली. तेरे को देख लेंगे, अशी धमकी देण्यात आली. एका वृत्तवाहिनीवरील फाळणीच्या मुद्यावर चर्चात्मक कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. या कार्यक्रमात काँग्रेस पक्षाच्या वतीने लोंढे यांनी सहभाग घेतला. या कार्यक्रमानंतर लोंढे यांना धमकी देण्यात आली.




आगामी पालिका निवडणुकीसाठी उद्धव आणि राज ठाकरे एकत्र येणार असल्याची जोरदार चर्चा चालू असतानाच दादर येथील शिवसेना भवनाबाहेर, मुंबई महानगरपालिकेची हंडी आम्हीच फोडणार मुंबईकरांचे ठरलंय! मुंबई महानगरपालिकेत फक्त आणि फक्त ठाकरे ब्रॅण्डच, असा मजकूर लिहिलेले फलक लागले आहेत.

नवा काळ **विजय** उद्या वाचा



पंतप्रधानांचा चीन दौरा का महत्त्वाचा?







## राहुल गांधींची लाल किल्ल्यावरील ध्वजारोहणाला दांडी! भाजपाची टीका

■ नवी दिल्ली



**विरोधी** पक्षनेता राहुल गांधी व काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे यांनी दिल्लीतील काँग्रेस मुख्यालयात ध्वजारोहण केले. हे दोन्ही नेते लाल किल्ल्यावरील स्वातंत्र्य दिन कार्यक्रमाला उपस्थित नसल्याबद्दल भाजपाने राहुल गांधींवर टीका केली.

भाजपा प्रवक्ता शहजाद पुनावाला यांनी आपल्या एक्स अकाऊंटवर लिहिले की, आताच मी एका वाहिनीवरील चर्चेत सहभागी झालो होतो. त्यावेळी काँग्रेस प्रवक्त्यांकडून मला हे समजले की, राहुल गांधी व मल्लिकार्जुन खरगे यांनी लाल किल्ल्यावरील ध्वजारोहणाला जाणे टाळले. त्यांचे हे कृत्य देशविरोधी असून ते पाकिस्तानचे चाहते असल्याचे यातून स्पष्ट होत आहे. ते देशाचा व देशातील सैन्याचा नेहमीच विरोध करत आलेले आहेत. दरम्यान, राहुल गांधी व खरगे यांनी दिल्लीच्या इंदिरा भवन येथे ध्वजारोहण केले. काँग्रेसने आपल्या एक्स अकाऊंटवर म्हटले की, आम्ही लोकशाही व घटनेप्रती वचनबद्ध असून त्याच्या रक्षणासाठी सदैव तयार राहू. या ध्वजारोहणाच्या वेळी राष्ट्रगीत सुरु असताना पाऊस आला. मात्र राहुल गांधींनी विचलीत न होता पावसातच उभे राहून राष्ट्रगीत पूर्ण होऊ दिले. यावेळी असंख्य काँग्रेस नेते, कार्यकर्ते व पदाधिकारी उत्स्फुर्तपणे उपस्थित होते.

## बेस्टच्या २२ हजार कामगारांना ५०० चौरस फुटांचे घर देणार

**प्रसाद लाड यांचे आश्वासन**

■ मुंबई

**पोलीस** आणि डबेवाल्यांच्या धर्तीवर बेस्टच्या २२ हजार कामगारांना प्रत्येकी ५०० चौरस फुटांचे घर अवघ्या १५ लाखांत हे घर उपलब्ध करून देण्यासाठी प्रयत्न करणार असल्याचे आश्वासन भाजपा आमदार प्रसाद लाड यांनी दिले.

यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे पाठपुरावा करण्यात येणार आहे, असेही त्यांनी स्पष्ट केले.दि बेस्ट एम्प्लॉईज को-ऑपरेटिव्ह क्रेडिट सोसायटीच्या निवडणुकीत उद्धव आणि राज ठाकरे यांनी एकत्र पॅनेल उभे केले आहे. त्याविरोधात भाजपाच्या प्रसाद लाड, प्रवीण दरेकर,नारायण राणे आणि शिवसेना शिंदे गटाच्या किरण पावसकर यांनी सहकार समृद्धी पॅनेल उभे केले आहे.

या पॅनेलची धुरा भाजपा नेते प्रवीण दरेकर आणि आमदार प्रसाद लाड यांच्या हाती सोपवण्यात आली आहे. प्रसाद लाड यांनी जोरदार प्रचार सुरू केला असून त्यांनी बेस्ट कर्मचाऱ्यांना अनेक आश्वासने दिली आहेत. या पार्श्वभूमीवर आयोजित पत्रकार परिषदेत ते म्हणाले की, आम्ही पुढाकार घेऊन १९४०० बेस्ट कर्मचाऱ्यांचा ५२ कोटींचा विशेष कोविड भत्ता प्रदान केला आहे. बेस्ट कामगारांना घरे देणे आणि त्यांच्या मुलांना नोकरीत संधी उपलब्ध करून देणे हा आमचा ठाम संकल्प आहे. या निवडणुकीत दोन ठाकरे एकत्र आले आहेत. सहकारात पक्ष आणू नये, ही भूमिका राष्ट्रवादी काँग्रेसचे ज्येष्ठ नेते शरद पवार आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची आहे. परंतु ठाकरे बंधूंचे सहकारात अस्तित्व शून्य आहे.

## बंगळुरूच्या सिलिंडर स्फोटात चिमुकला ठार

■ बंगळुरू

**बंगळुरू** येथील विल्सन गार्डन चिन्नायणपल्या परिसरात आज सकाळी साडेआठ वाजताच्या सुमारास गॅस सिलिंडरचा भीषण स्फोट झाला. या स्फोटात मुबारक (१०) हा चिमुकला ठार झाला. तर जखमींमध्ये कस्तुरमा (३५), सरसम्मा (५०), शब्बीरना बानू (३५), सुब्रमणी (६२), शेख नजीद उल्ला (३), फातिमा (८) यांच्यासह एकूण १२ जणांचा समावेश आहे. सर्व जखमींवर रुग्णालयात उपचार सुरु आहेत. हा भाग अत्यंत दाट लोकवस्तीचा आहे. घरांची रचना एकमेकांना लागून असल्याने या स्फोटात आजूबाजूच्या सुमारे १० घरांचे नुकसान झाले. घटनेची माहिती मिळताच पोलीस व बचावपथक घटनास्थळी दाखल झाले.

बंगळुरू पोलीस आयुक्त सीमंथ कुमार सिंह म्हणाले की, सकाळी



अडुगोडी भागात स्फोट झाला. ७-८ घरे पूर्णपणे आणि आणखी ७-८ अंशतः नुकसान झाले. एका मुलाचा मृत्यू झाला तर ९ जखमी आहेत. जखमींमध्ये एकाची प्रकृती गंभीर आहे. जखमींवर ५ रुग्णालयांमध्ये उपचार सुरु आहेत. मुख्यमंत्री सिद्धरामय्या यांनी घटनास्थळी भेट दिल्यानंतर सांगितले की, हा सिलिंडर स्फोट असल्याची शक्यता आहे. या दुर्घटनेत एकूण १२ जण जखमी झाले आहेत. मुबारक या मुलाचा मृत्यू झाला

**१२ जण जखमी**

आहे तर कस्तुरम्मा आणि नरसम्मा या महिलांना व्हिक्टोरिया रुग्णालयात दाखल केले आहे. सरकारने मृत मुलाच्या कुटुबियांना ५ लाख रुपयांची मदत जाहीर केली असून जखमींच्या उपचाराचा खर्च सरकार उचलणार आहे. कस्तुरम्मा गंभीर भाजल्या असल्याने त्यांच्यावर विशेष उपचार केले जातील.

## झारखंडच्या महिलांचा रात्रपाळीत काम करण्याचा मार्ग मोकळा

■ रांची

**झारखंडमधील** महिला आता रात्रपाळीत काम करू शकणार आहेत. झारखंड फॅक्टरी घटनादुरुस्ती विधेयकाला राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी या विधेयकाला मंजुरी दिल्यानंतर त्यांचा हा मार्ग मोकळा झाला आहे.

झारखंड फॅक्टरी कायदा १९४८ नुसार महिलांना रात्री सात वाजल्यापासून ते सकाळी सहा वाजेपर्यंत कोणत्याही कारखान्यात किंवा आस्थापनेत काम करण्यास बंदी होती. या कायद्याचे घटनादुरुस्ती विधेयक झारखंडच्या विधिमंडळात संमत झाल्यानंतर ते राज्यपालांकडे मंजुरीसाठी पाठवण्यात आले. राज्यपालांनी ते विधेयक राष्ट्रपतींच्या संमतीसाठी पाठवले होते. त्याला



राष्ट्रपतींनी मंजुरी दिली आहे. राज्य सरकारकडे हे विधेयक आल्यानंतर त्यावरचा अध्यादेश काढण्यात येणार असून येत्या दहा दिवसांत या कायद्याची अंमलबजावणी सुरु होईल, अशी माहिती सरकारी सूत्रांनी दिली आहे.